# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक १४/०९/२००६ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.११) इतिवृत्त**

**गुरूवार** दिनांक **१४ सप्टेंबर २००६** रोजी स्थायी समितीची सभा मा.सभापती **श्री.रेणुकादास (राजू) वैद्य** यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिका मुख्य कार्यालयातील 'मलिक अंबर स्थायी समिती सभागृह' येथे **सकाळी ११.३० वाजता** "वंदे मातरम्" या गिताने सुरू झाली. या सभेस मा.आयुक्त, नगर सचिव व अधिकारी वर्गासह खालील सन्माननीय सभासद उपस्थित होते.

1. श्री. कावडे साहेबराव राणुबा
2. श्री. गवळी रविकांत काशिनाथ
3. श्री. गायकवाड दिलीप नारायण
4. सौ. दलाल लता श्रीनिवास
5. श्री. दाभाडे मिलींद यशवंत
6. श्री. पांडे विनायक प्रभाकर
7. डॉ. आशा उत्तमराव बिनवडे
8. श्री. शिरसाट संजय पांडूरंग
9. श्री. तुपे त्रिंबक गणपतराव
10. श्री. दाभाडे हिंमतराव साळूबा
11. श्री. बमणे पुनमचंद सोनाजी
12. श्री. मो. जावेद मो. इसाक
13. श्री. हाजी शेरखान अ. रहेमान

**संवाद :**

श्री.मो.जवेद मो इसाक : मागील दोन/तीन महिन्यापुर्वी दमडी महल येथील पुलाच्या त्यानंतर बाबत एक प्रस्ताव सभागृहात मंजुरीसाठी ठेवण्याबाबत सुचना दिल्या होत्या, त्यावर काय तांत्रिक कार्यवाही झाली. त्यानंतर तो प्रस्ताव सभागृहापुढे ठेवण्यात आला नाही. त्याबाबत खुलासा व्हावा.

मा.सभापती : मा.आयुक्त याबाबत खुलासा करतील.

मा.आयुक्त : दमडीमहल पुलाबाबत पुढे कार्यवाही आहे की, तेथील कार्यालयासाठी नाथ सुपर मार्केट येथे जगा आम्ही त्यांना सुचविलेली आहे. तेथे जे शासकीय कृषी विभागाचे कार्यालय आहे ते शिफ्ट करावे. याबाबत बोलणी चालू आहे. आपणास तो प्रस्ताव मंजूर करण्यात काही हरकत नाही. तो प्रस्ताव पुन्हा सभागृहा पुढे का आला नाही याबाबत संबंधीत विभाग प्रमुख यांना विचारून पुढील सभेत प्रस्ताव ठेवला जईल.

श्री.त्रिंबक तुपे : प्रभाग ''क''मध्ये मागील तीन महिन्यापुर्वी प्रभाग अधिकारी नाहीत. मी हा विषय मा.आयुक्त यांच्याकडे मागील तीन बैठकी पासुन दिला आहे. उपआयुक्त यांनाही सांगितले आहे. माझ्या माहिती प्रमाणे प्रभाग अधिकारी म्हणून श्री.सुर्यवंशी यांचे आदेश काढले आहेत. त्यांचे म्हणणे आहे की, त्यांना तेथे रूजु व्हावयाचे नाही किंवा काम करायचे नाही. दुसऱ्या कोणाची ऑर्डर काढली किंवा नाही याचा खुलासा करावा.

मा.सभापती : उपआयुक्त (म)यांनी याबाबत खुलासा करावा.

उपआयुक्त : वार्ड कार्यालय ''क'' येथील प्रभाग अधिकारी निलंबीत झाल्यामुळे प्रभाग अधिकारी या पदाचा अतिरीक्त कार्यभार प्रभाग अभियंता श्री.खालेद सैफोद्दीन यांच्याकडे सोपविण्यात आला आहे. त्यांना प्रभाग अधिकारी आणि प्रभाग अभियंता या दोन पदाचे काम सांभाळताना ताण पडत आहे. त्यामुळे प्रशासनाने दिनांक ५.९.०६ रोजे प्रभाग अधिकारी या पदाचा कारभार वार्ड ''ब''चे प्रभाग अधिकारी श्री.दिलीप सुर्यवंशी यांच्याकडे दिलेला आहे. त्यांनी अद्याप पदभार घेतलेला नाही. पदभार स्विकारण्याचे पत्र प्रशासनाने त्यांना काल दिलेले आहे.

श्री.त्रिंबक तुपे : सभागृहात खुलासा झाल्याप्रमाणे प्रशासनाने दिनांक ५.९.०६ रोजे श्री.सुर्यवंशी यांना रूजु होणे बाबत पत्र दिले आहे तरी ते आजपर्यंत रूजु झालेले नाहीत, म्हणजे ते प्रशासनाचे ऐकत नाहीत का, त्यांना ते आदेश बंधनकारक नाहीत का?

मा.सभापती : श्री सुर्यवंशी यांना आजच्या आज वार्ड ''क'' कार्यालयात रूजु होण्याच्या सुचना देण्यात याव्यात अशी प्रशासनास सुचना देण्यात येते.

श्री.रविकांत गवळी : हर्सूल तलावात बुडून एका मुलाचा मृत्यू झालेला आहे. मागील सभेत त्या मुलाच्या नातेवाईकांना मनपातर्फे अकरा हजर रूपये देण्यात यावे अशी चर्चाही झालेली आहे. पण अद्याप पर्यंत ही रक्कम त्यांना मिळालेली नाही.त्या लोकांनी वारंवार मनपा मध्ये येऊनही ही रक्कम त्यांना मिळत नसेल तर त्यांनी काय करावयाचे.

मा.सभापती : या संदर्भात प्रशासनाला अशा सुचना देण्यात येत आहे. की, ही बैठक संपे पर्यंत त्यांचा चेक तयार करण्यात यावा. माझ्या दालनात त्यांना बोलवून घेण्यात यावे आज त्यांना चेक देण्यात येईल.

श्री.दिलीप गायकवाड : सर्व शिक्षा अभियान अंतर्गत ज्या विषय तज्ञ आणि इतर पदाची भरती झाली त्या भरतीमध्ये माझ्या अंदाजनुसार पारदर्शकता नाही. या भरतीमध्ये घोटाळा झालेला आहे म्हणून ही भरती रद्द करण्यात यावी.

श्री.हिम्मतराव दाभाडे : माझे मित्र श्री.दिलीप गायकवाड यांनी जे मुद्दा उपस्थित केला या सर्वशिक्षा अभियाना अंतर्गत जी भरती झाली आहे. त्या ठिकाणी भ्रष्टाचार झालेला आहे. म्हणून ती भरती त्वरीत रद्द झाली पाहिजे, परत भरती करावी.

श्री.मिलिंद दाभाडे : माझ्या वार्डात १० ते १५ लाख रूपये खर्च करून मनपाने दवाखान्याची फार मोठी इमारत बांधली आहे. ही इमारत बांधुन एक वर्ष पुर्ण झाले. परंतु त्या ठिकाणी दवाखाना सुरू व्हावा या दृष्टीने आरोग्य विभाग कुठलीही कार्यवाही करताना दिसुन येत नाही. तेव्हा लवकरात लवकर त्या ठिकाणी आरोग्य केंद्र चालू करण्यात यावे.

मा.सभापती : आरोग्य केंद्र सुरू करण्याच्या संदर्भाने जे काही कार्यवाही करणे आवश्यक आहे ती त्वरीत करण्यात यावी.

श्री.त्रिंबक तुपे : मागील सभेत या शहरातील दारिद्रय रेषेखालील लोकांच्या सर्वे बाबत मी एक प्रश्न विचारला होता. मा.आयुक्तही त्या बैठकीस हजर होते. त्यावेळी उपआयुक्त (प्र) यांनी जे सर्वे झालेला आहे तो १ तारखेपर्यंत शासनाकडे पाठविणार आहेत असे सांगितले होते.तेव्हा सर्वे शासनाकडे पाठविण्यात आला किंवा नाही, त्याचे पुढे काय झाले. याची सविस्तर माहिती या सभागृहात देण्यात यावी.

मा.सभापती : मा.आयुक्त यांनी या संदर्भात खुलासा करावा.

मा.आयुक्त : सर्वेचे काम झालेले आहे. १ तारखेपर्यंत भाषांतर करून पाठवू असे सांगितले होते. यात शासनाचे जे दर आहेत ते पंचवीस पैसे आहेत. कोणीही काम करण्यास तयार नाही म्हणून श्रमीक विद्यापीठाला आपण सांगितले होते. त्यात संगणकात काही अडचण निर्माण झाली त्यामुळे देता आले नाही.

श्री.त्र्यंबक तुपे : या शहरात ८० हजर नागरिक दारिद्रय रेषेखाली राहतात. आणि आजची परिस्थिती अशी आहे की जिल्हाधिकारी कार्यालयाने २५०/२५० फार्म सदस्यांकडे पाठवले आहेत. ते २५० फार्म पुरणार नाहीत या ८० हजर लोकांचा जे सर्वे झाला त्यांना जर ते कार्ड मिळाले असते तर त्याची यादी तयार झाली असती. तर ही जी गर्दी आहे त्यात ते ८० हजर लोक सुध्दा आहेत. आणि बाकीचे जे लोक आहेत ते सुध्दा फार्मसाठी रांगेत उभे आहेत. त्यामुळे त्या कार्यालयात वाद होऊ लागला आहे. हा प्रश्न गांभीर्याने का घेतला जत नाही.

मा.आयुक्त : या प्रश्नाला प्रशासनाने गांभीर्याने घेतलेले आहे. या कामासाठी जेवढ्या स्टाफची आवश्यकता असेल तो दिला जईल. सर्वे करून ३/४ महिने झाले आहेत. प्रशासनाने यादी दाखल केली होती परंतु त्यांनी भाषांतरीत करून मागितली. ही यादी शासनाकडे गेल्यानंतर ही जेपर्यंत शासनाची मंजुरी येत नाही तो पर्यंत या नागरीकांना पुढचे फायदे मिळणार नाहीत. हे प्रकरण प्रशासनाने गांभीर्याने घेतलेले आहे. श्रमिक विद्यापिठाकडून ४-५ दिवसात जईल.

श्री.हिम्मतराव दाभाडे : मनपाने दारिद्रय रेषेखालील नागरीकांचा जे सर्वे केला होता तो मराठीत झालेला आहे. तो आता इंग्रजीमध्ये करावयाचा आहे. यात प्रशासनाने जवळ जवळ एक वर्ष वेळ घालवलेला आहे. नागरीकांना कार्डावर रॉकेल मिळत नाही. त्यासाठी पुरवठा अधिकारी यांची भेट घेऊन सांगितले की, पुर्ण वार्डाचे नागरिक एकत्र बोलावून फार्म वाटप करत असाल तर या ठिकाणी भांडणे,वाद निर्माण होत आहे. कार्यालयाचे नुकसान होत आहे. त्यातुन मार्ग म्हणून प्रत्येक वार्डासाठी एक हजर फार्म देण्याची व्यवस्था केली आहे. कृपया विनंती आहे की, नगरसेवकांनी श्री.राठोड साहेब यांना भेटून आपल्या वार्डासाठी एक हजर फार्म घेऊन जवे.

सौ.लता दलाल : स.सदस्य श्री.तुपे यांनी जे प्रश्न चर्चेला घेतलेला आहे तो प्रशासनाने गांभिर्याने घ्यावा. ज्यांच्याकडे पिवळे रेशन कार्ड म्हणजे ज्याचा बीपीएलचा सर्वे झालेला नाही त्याच्याकडे रेशनकार्ड नाहीत. परंतु ज्यांच्याकडे रेशनकार्ड आहे अशा लोकांकरिता फार्म आमच्याकडे आलेले आहेत. ज्या नागरीकांचा बीपीएल सर्वे झालेला आहे. ते नागरीक असे म्हणतात की, आताचा सर्वे होऊन वर्ष झाले आमचे रेशन कार्ड कुठे आहे अशी विचारणा करतात. या लोकांना तुम्ही कसे फार्म देतात याचा आम्हा नगरसेवकांना त्रास होत आहे. यात नगरसेवकाची कुठली चूक नाही. प्रशासनाची किंवा शासनाची चूक असेल हा प्रश्न थोडा गांभिर्याने घ्यावयाला हवा होता.तो घेतलेला नाही असा आमचा स्पष्ट आरोप आहे. संबंधीत विभागाची सुवर्ण जयंती योजना घरकुल योजना या गोष्टीकडे जस्त लक्ष असते, मात्र रेशनकार्ड या योजनेकडे त्यांना जस्त लक्ष द्यावयाला वेळ नसतो. त्यामुळे त्यांनी याकडे लक्ष द्यावे. या शिवाय दुसरा प्रश्न असा की, मागील बैठकीत व त्या पुर्वीच्या बैठकीमध्ये रस्त्याच्या हिस्ट्री रजिष्टर बाबत आम्ही वारंवार प्रश्न उपस्थित केला आहे. त्यावेळी मागील सभेत रजिष्टर तयार आहे असे सांगण्यात आले

होते. ते रजिष्टर सभागृहासमोर सादर करण्यात यावे. दुसरे असे की, एस जी एस या कंपनीला रस्त्याच्या सर्वेसाठी किंवा चौकशीसाठी नियुक्त करण्यात आले आहे, या एजन्सीने रस्त्याची पाहाणी आताशी सुरू केली आहे. आणि एजन्सीचे काम पुर्ण होत नाही तोपर्यंत गुत्तेदाराचे देयक थांबविण्यात यावे असे निर्देश दिलेले आहेत. परंतु माझ्या माहितीप्रमाणे गुत्तेदाराचे ९०% बील देण्यात आले आहेत का, कदाचित माझी माहिती चुकीची असेल. याचा या ठिकाणी खुलासा करावा आणि जर बील दिले गेले असेल तर चौकशी पुर्ण होण्यापुर्वी कोणत्या आधारावर ते बील देण्यात आले याची पण माहिती या सभागृहाला मिळाली पाहिजे. सर्व सदस्य आणि प्रसार माध्यम यांनी रस्त्याच्या तक्रारीसंबंधी वारंवार आवाजउठवला आहे. तरीही त्या गुत्तेदाराची बीले दिली गेली आहेत. स.सदस्य श्री.प्रल्हाद निमगांवकर यांच्या वार्डातील आदित्यनगर, मेहेरनगर येथील रस्ते पुर्णपणे वाहून गेलेले आहेत. या वार्डाचे डांबरीकरणासाठी रू.१५ लाख मंजुर केले होते. ते पूर्ण रस्ते वाहून गेलेले आहेत याची जबाबदारी आपण कोणावर निश्चित करणार, याला कोणास जबाबदार धरणार आहात. निधी नाही म्हणून आमच्या वार्डातील काम २.५ लाखाहून १.५ लाखावर आणतो. मग हे पैसे जतात याची जबाबदारी आपण कोणावर निश्चित करणार आहात ते आज या सभागृहाला कळल पाहिजे. दुसर अस की , संपुर्ण शहरातील रस्त्याची उप अभियंत्यामार्फत शहरातील किती रस्ते खराब झालेले आहेत, किती रस्ते सुस्थितीत आहेत याची चौकशी केली आहे असा ज्याचा रिपोर्ट आपल्याकडे आला असेल त्यानुसार किती रस्ते खराब किती सुस्थितीत आहेत ही माहितीही सभागृहाच्या दृष्टीने महत्वाची वाटते. या शिवाय माहितीच्या अधिकारात एका व्यक्तीने गेल्या वर्षी चौकशीच्या संदर्भात रस्त्याची माहिती आपल्याकडे मागितली होती यावर अधिक्षक अभियंता यांची चौकशी समिती नेमुन चौकशी करण्यास सांगण्यात आले होते. त्याचा रिपोर्ट आपल्याकडे येऊन चार महिने झाले. या संदर्भात काय कार्यवाही झाली, त्यात कोण दोषी आहेत हे सुध्दा या सभागृहाला समजले पाहिजे.त्याची माहिती सभागृहाला देण्यात यावी.

मा.सभापती : अति.शहर अभियंता यांनी रोड हिस्ट्री रजिष्टर मेन्टेन करतो किंवा नाही या संदर्भात खुलासा करावा.

अति.शहर अभियंता : मागील वर्षी याच सभागृहात रस्त्याच्या बाबत हिस्ट्री रजिष्टर ठेवावे असा मुद्या उपस्थित झाला होता तेव्हापासून हिस्ट्री रजिष्टर ठेवतो. २००५-२००६ या वर्षापासुन रस्त्याचे हिस्ट्री रजिष्टर मेन्टेन करण्याच काम सुरू करण्यात आल आहे. या वर्षाच आता इस्टीमेशन प्रगतीपथावर आहेत त्याचे ज्यावेळी एक्झीब्युशन सुरू होईल त्यावेळी त्याचे हिस्ट्री बुक आम्ही तयार करू. हे काम फक्त मागील वर्षापासून सुरू झालेले आहे.

मा.सभापती : रोड हिस्ट्री रजिष्टर जे आपण मेन्टेन करतो ते सभागृहात सादर करावे. मागच्या वर्षी सभागृहाने ५ लाखांच्या वरील डांबरीकरण कामांचे तपासणी करण्याच्या सूचना दिल्या होत्या. एसजीएस, पुणे यांचेतर्फे पाहणीचे काम सुरू आहे. काम सुरू असताना चाचण्या घेतल्या असतील.

अति.शहर अभियंता : मागील वर्षी या सभागृहाने ५ लाखावरील डांबरीकरणाची जी कामे आहेत ती थर्ड पार्टी इन्स्पेक्शन म्हणून एस.जी.एस पुणे तर्फे सुरू करण्यात आली आहेत.५ लाखावरील सर्व कामाचे इन्स्पेक्शन एस.जी.एस, करत आहे. काम सुरू असताना

टेस्टींग,सर्वेक्षण यापुर्वीच त्यांनी केलेले आहे. पोस्ट रिपोर्ट जे असतो त्यासाठी आता पुन्हा रस्त्याची पाहणी एस.जी.एस च्या प्रतिनिधीमार्फत होत असते.

सौ.लता दलाल : एस.जी.एस चा रिपोर्ट देण्यापुर्वी गुत्तेदाराची बील दिली आहेत का, एस.जी.एस चा रिपोर्ट आल्यानंतर गुत्तेदाराची बीले दिली गेली पाहिजे असा नियम आहे. गुत्तेदाराने चुकीचे काम केले असा रिपोर्ट त्यांनी दिला तर गुत्तेदार तुम्हाला तुमचे पैसे परत आणुन देणार नाहीत. तर आपण अशी काही बील दिली आहेत का.

अति.शहर अभियंता : प्रिलीमीनरी जे रिपोर्ट त्याच्याकडून सादर झाला त्यानंतर गुत्तेदाराचे बील देण्यात आले आहे. त्यातही पोस्ट रिपोर्ट साठी त्यांचे जवळजवळ २०% रक्कम राखुन ठेवली आहे. त्यांचे अहवाल मिळेपर्यंत देयक नाही.

सौ.लता दलाल : आता आपण ज्या गुत्तेदारावर काही कार्यवाही करणार आहात का एस.जी.एस चा रिपोर्ट आपल्याकडे सादर झालेला आहे का.

मा.आयुक्त : ही वस्तुस्थिती आहे की, थोडे रनिंग बील आम्ही थर्ड पार्टी इन्स्पेक्शन शिवाय मंजूर करत होतो. आता एक महिन्यापुर्वी पासून ही बाब थांबविण्यात आली आहे. कधी कधी हे रनिंग बील ५०%, ६०% च्या वर जते.आता तो पर्यंत थर्ड पार्टी इन्स्पेक्शन होत नाही तो पर्यंत असे बील काढू नये म्हणून आदेश दिले. रनिंग बील आले होते ते थांबवले. ज्यांना बील दिली गेली आहेत त्याचा अंतिम रिपोर्ट येईपर्यंत २०% बील थांबविण्यात आले आहे. अशा कामाचा रिपोर्ट निगेटीव्ह आला तर अशा कामाचे २०% बील थांबवणे आणि संबंधीत गुत्तेदाराचे नाव काळ्या यादीत टाकण्यात येईल.

सौ.लता दलाल : हा जनतेचा पैसा आहे.हा प्रश्न प्रशासनाने गंभीररित्या घेतलेला नाही असा माझा स्पष्ट आरोप आहे.बील दिली आहे आणि तरी ही रोड वाहून गेलेले आहेत त्यावर कार्यवाही करणार आहात.आतापर्यंत ९०% बील देण्यात आले असले तरी अशा कामाच्या पाहणीला काहीही अर्थ उरत नाही.याचा अर्थ ती चौकशी समिती आपण मॅनेज केली आहे.असा अर्थ आम्ही घ्यावयास काही हरकत नाही. मग याला आपण कोणाला जबाबदार धरणार आहात.

मा.आयुक्त : ज्या गुत्तेदाराची बील दिली गेली आहेत अशा गुत्तेदाराची २०% रक्कम थांबविण्यात आलेली आहे. अशा कामाचे २०% बील थांबविण्यात येईल आणि त्या गुत्तेदाराचे नाव काळ्या यादीत टाकता येईल आणि यापुढे ज्या कामाचे थर्ड पार्टी इन्स्पेक्शन होणार नाही तो पर्यंत त्या कामाचे रनिंग बील द्यावयाचे नाही अंतिम बिलापुर्वी अशा कामाचे थर्ड पार्टी इन्स्पेक्शन करून घेण्यात येईल. ज्या कामाचे थर्ड पार्टी इन्स्पेक्शन होण्याआधी कामाचे रनिंग बील देण्यात आले आहे. त्या कामाची उपअभियंता, कनिष्ट अभियंता यांनी पाहणी करून प्रमाणित केलेले आहे.

सौ.लता दलाल : थर्ड पार्टी इन्स्पेक्यन साठी संबंधीत एजन्सीला आपण ०.६% चे बील देतो ते विनाकारण देत आहोत का बक्षिस म्हणून देत आहोत. आपण कामाचे ८०% बील दिले आहे.नंतर एस.जी.एस चा रिपोर्ट येईल तो नंतर मॅनेजकरून घेता येईल का.

मा.सभापती : थर्ड पार्टी इन्स्पेक्शन बाबत अधिक्षक अभियंता यांनी खुलासा करावा.मनपाचे उपअभियंता, कनिष्ट अभियंता, शाखा प्रमुख व्यवस्थीत काम करतात का जेथर्ड पार्टी इन्स्पेक्शन चालू आहे ते योग्य प्रकारे होते आहे का या संदर्भात खुलासा करण्यात यावा.

शहर अभियंता : थर्ड पार्टी इन्सपेक्शन आपण एस.जी.एस कडे दिलेले आहे. त्यानंतर इंजिनियरींग कॉलेजला ही टेस्टींगसाठी पाठवितो.एस जी एस आणि इंजिनियरींग कॉलेजचा रिपोर्ट व्यवस्थीत आला तरच गुत्तेदाराला रनिंग पेमेंट करतो इंजिनियरींग कॉलेजला सॅम्पल पाठविण्यात येते ते सील केलेले असते.

श्री.विनायक पांडे : ते लोक साईटवर येऊन पाहणी करतात का.ज्या ठिकाणी काम चालू आहे त्या ठिकाणी येऊन चेक करतात का.

शहरअभियंता : आपण इंजिनियरींग कॉलेजला सील केलेले सॅम्पल पाठवतो. एस जी एस कंपनी साईटवर येऊन पाहणी करते.

श्री.विनायक पांडे : प्रत्येक गुत्तेदाराकडून त्याचा हप्त बांधलेला आहे का ज्यावेळी आम्ही बी अॅड सी मध्ये डब्ल्यु बी एम ची काम करावयाचो त्यावेळी कॉलीटी कंट्रोल मध्ये तीन हजर रू. पाठवले की, हे काम व्यवस्थित झाले आहे असा त्याचा रिपोर्ट यावयाचा मग हे गुत्तेदार तसाच रिपोर्ट आणतात का.

सौ.लता दलाल : एस जी एस चा रिपोर्ट आपल्याकडे आलेला आहे का त्यावर काय लिहिलेले आहे. तो ओ के आहे का तो कोणी दिला तो रिपोर्ट या सभागृहासमोर सादर करण्यात यावा आम्ही त्या एजन्सीवर न्यायालयात खटला दाखल करणार आहोत. रस्ते वाहून गेले आहेत आणि त्या रस्त्याबाबत कोणती संस्था ओ के रिपोर्ट देते त्याची नोंदणी न्यायालयामार्फत रद्द करायला लावण्याची मागणी कोर्टात करू ही सभागृहाची दिशाभूल चालली आहे. ही सभा पंधरा मिनीट तहकुब करा. प्रशासनाकडे ओ के बील देण्यात आली आहेत का.ते रिपोर्ट सभागृहात आणण्यास किती वेळ लागणार आहे.

श्री.त्र्यंबक तुपे : मा.सभापती मागील वेळेस मी आपणास विनंती केली होती, मोंढा परिसर जे आहे त्या ठिकाणी २५ लाख रूपये खर्च करून काम करण्यात आले आहे. तेथील पूर्ण रोड वाहून गेले आहेत.

मा.सभापती : रोड हिस्ट्री बुक आणि संबंधित दिलेले रिपोर्ट या सभागृहात अर्ध्या तासात सादर करण्यात यावे.ही सभा अर्ध्या तासासाठी तहकुब करण्यात येते.

(वेळ अंदाजे १२.०५ वाजता. तहकुब करण्यात आलेली स्थायी समितीची सभा पुन्हा १२.३० वाजता सुरू झाली.)

सौ.लता दलाल : सभापती महोदय आपल्याकडे जर माहिती आली असेल तर ती सभागृहासमोर सादर व्हावी.एस जी एस कंपनीने दिलेला ओ के रिपोर्ट बारीक अक्षरात आहे तो आम्हाला समजत नाही. तेव्हा या रिपोर्टच्या प्रती आम्हाला देण्यात याव्यात. जेणे करून आम्हाला त्या एजन्सीच्या विरोधात चॅलेंज करता येईल.शहरातील जवळ जवळ सर्वच रस्ते खड्ड्यात गेले आहे. शहरातील प्रत्येक रस्त्यावर मोठे मोठे खड्डे झाले आहेत. तरी पण एस जी एस कंपनी रस्ते ओ के असल्याचा रिपोर्ट देत असेल तर त्या एजन्सीच्या विरोधात मी स्वत: कोर्टात जईल.

मा.आयुक्त : एस जी एस कंपनीला मागील वर्षापासून आपण काम द्यावयाला सुरूवात केली आहे. एस जी एस कंपनीला काम देण्याबाबत स्थायी समितीची मान्यता घेऊन मागच्या वर्षापासून सुरू केले आहे. यापुर्वी आपण इंजिनियरींग कॉलेजकडून थर्डपार्टी कन्स्पेक्शन करून घेत होतो. या कंपनीची भारतात चांगली प्रतिष्ठा आहे. एस जी एस कंपनीला जी कामे देण्यात आली आहेत त्यातील ५ लाखाच्या वर खर्च असलेल्या

कामाची यादी मा.सभापतीकडे देण्यात यावी.या रस्त्याची सध्या काय परिस्थिती आहे आणि ज्या रस्त्याचे काम आपल्या फॉर्म प्रमाणे झालेले आहे किंवा नाही.रस्त्यावरील पाण्याचा होतो किंवा नाही यात कंपनी काहीच म्हणणार नाही त्यात निकषाप्रमाणे काम झाले किंवा नाही एवढेच ही कंपनी सांगेल.

श्री.त्र्यंबक तुपे : या शहरात ३/४ महिन्यापुर्वी जे डांबरीकरणाच काम करण्यात आल त्यातले बरेचसे रस्ते वागून गेले आहेत.आणि एस जी एस कंपनीकडून असे रिपोर्ट येत असतील तर हे समजण्यासारख नाही.

मा.आयुक्त : एस जी एस कंपनीने कोणत्या कोणत्या कामाची पाहणी केली आहे त्याची यादी मा.सभापती यांना देण्यात येईल.

सौ.लता दलाल : एस जी एस ने ज्या ज्या रस्त्याची कामे केली आहेत त्या रस्त्याची यादी आणि त्याचा रिपोर्ट आणि प्रशासनाने त्यांना काय स्पेसीफिकेशन दिले होते, आमचे रस्ते कसे असतील हे मा.सभापती यांचे कडे द्यावे तसेच इंजिनियरींग कॉलेज मार्फतही काही रस्त्याचे थर्ड पार्टी इन्स्पेक्शन केले आहे त्यांना आपण नमुने नेऊन देतो. ते साईटवर येत नाही खर तर त्यांनी साईटवर यायला पाहिजे त्याचाही रिपोर्ट मा.सभापती यांचे कडे द्यावा.ते सर्व रिपोर्ट आम्हाला देण्यात यावेत जेणे करून ते जर चुकीचे रिपोर्ट देत असतील तर त्या पार्टीवर कार्यवाही झाली पाहिजे कारण त्यांना आपण जनतेचा पैसा देतो.तेव्हा एक एक प्रत देण्यात यावी. दुसरे असे की, अधिक्षक अभियंता आणि उपअभियंता यांच्याही रिपोर्टची एक एक प्रत आम्हाला देण्यात यावी.

मा.सभापती : स.सदस्य श्री.त्र्यंबक तुपे आणि सौ.लता दलाल यांनी अत्यंत रास्त असे मुद्दे उपस्थित केले आहेत. त्यांनी जे जे काही मुद्दे मांडले आहेत त्या सर्व मुद्याची माहिती पुढील सभेपुर्वी माझ्याकडे यावी अशी प्रशासनाने व्यवस्था करावी.

श्री.पुनमचंद बमणे : सुरक्षा विभागाचे जे कर्मचारी आहेत त्यांना तीन महिन्यापासून पगार मिळालेला नाही. तो का झाला नाही याचा खुलासा करावा यात वाहनचालक,बालवाडीचे कर्मचारी यांचाही सामावेश आहे.

सौ.लता दलाल : मनपाचे जे कर्मचारी रोजंदारीवर काम करतात त्यांचा गेल्या तीन महिन्यापासुन पगार झालेला नाही.

मा.सभापती : या संदर्भात मा.आयुक्त खुलासा करतील.

मा.आयुक्त : रोजंदारी कर्मचाऱ्यांच्या नेमणुकीबाबत आजपर्यंत सर्वसाधारण सभेकडे ही बाब गेली नाही. नियमाप्रमाणे या बाबीस सर्वसाधारण सभेची मान्यता पाहिजे तो प्रस्ताव येत्या २० तारखेच्या सर्वसाधारण सभेपुढे ठेवला आहे.

श्री.संजय शिरसाठ : मा.आयुक्ताच्या अधिकारात रोजंदारी कर्मचाऱ्यांना ठेवता येते. सहा महिन्यापेक्षा जस्त काळ असेल तर सर्वसाधारण सभेची मान्यता घेणे गरजेचे आहे. तीन महिन्यापासुन या कर्मचाऱ्यांना पगार नाही एक या या कर्मचाऱ्याचा पगार कमी असतो तेव्हा त्यांना पगार तर द्यावा, त्यांना पगार नसेल तर दुर्देवाची गोष्ट आहे.

मा.आयुक्त : रोजंदारी कर्मचाऱ्यांची फाईल दोन महिन्यापासुन मुहमेंट आहे. यात विधी सल्लागार, मुख्य लेखापरिक्षक यांच्या रिपोर्टनंतर हा प्रस्ताव आता सर्वसाधारण सभेकडे आला आहे.

श्री.संजय शिरसाठ : जनसंपर्क विभागातील कर्मचाऱ्यांना सायंकाळी ६ नंतर काही कामे सांगण्यात येतात या विभागात अवघे तीन कर्मचारी आहेत. जहिरात विभागात जयचे असेल तर त्यांना स्वत:च्या वाहनावर जऊन त्यांना रात्री ११ पर्यंत काम करावे लागते. व कागदपत्रे द्यावी लागतात.या कर्मचाऱ्यांना त्यांचा मोबदला देण्यात यावा. वर्ग-३ व वर्ग-४ चे तीन कर्मचारी आहेत.

मा.सभापती : जनसंपर्क विभागातील हे कर्मचारी निश्चितपणे मेहनतीने व प्रामाणिक पणे काम करतात त्यांना जस्तीच्या कामाचा मोबदला मिळाला पाहिजे जनसंपर्क विभागातील कर्मचाऱ्यांना जस्तीच्या कामाचा मोबदला देण्यात यावा. संबंधीत विभागाने योग्य ती कार्यवाही करावी.

श्री.त्रिंबक तुपे : कैलासनगर हा अत्यंत असा महत्वाचा असा रस्ता आहे. या रस्त्यावरून सर्व अंत्ययात्रा कैलासस्मशानाकडे जत असतात.या रस्त्यावर उघड्यावर बऱ्याच वर्षापासुन मांस विक्री चालू आहे. पुर्वी या ठिकाणी १-२ टपऱ्या होत्या आता ८-१० टपऱ्या आहेत. त्या टपऱ्या आज्ही हटविण्यात आल्या नाहीत. त्यांचे कर्मचारी रविवार ते रविवार त्या ठिकाणी जतात. हा रस्ता अत्यंत महत्वाचा आहे. तेथुन या शहराचे पुर्ण नागरिक जत असतात.अंत्ययात्रा जत असतात.या रस्त्यावर घाण पडलेली असते.आपण पाहणी करा.आज्ही त्या ठिकाणी त्याच परिस्थितीतील दुकाने आहेत.या मुख्य रस्त्यावर दुकाने लावण्याचा त्यांचा परवाणा आहे का याचा खुलासा करावा.ही परिस्थिती फक्त याच रस्त्याची आहे असे नाही तर शहरात कोणीही कुठेही ५ बाय ५ ची टपरी टाकतात त्या ठिकाणी बकरा लटकवतात. तेव्हा या शहरात आपण किती दुकानाचा परवाना दिला आहे किती दुकाने विना परवाना आहेत याचे काही रेकॉर्ड आहे का?

संचालक, प्रा.सं. : कैलासनगर रस्त्यावरील मटन दुकानाबाबत जे प्रश्न उपस्थित झाला आहे, त्या संदर्भात संबंधीताविरूध्द पोलिसांच्या मदतीने कार्यवाही करण्यात आली आहे. त्यांच्या विरूध्द अनेकवेळा केस दाखल केली आहे. त्यांचा मालही जप्त केला आहे.

मा.सभापती : सिल्लेखान्यात ज्या पध्दतीने कार्यवाही झाली आहे त्याच पध्दतीने या ठिकाणी कार्यवाही व्हावी.या रस्त्यावरून अंत्ययात्रा जतात म्हणून या रस्त्यावरून त्यांना कुठल्याही प्रकारची परवानगी देऊ नये.आणि ताबडतोब त्यांच्या विरूध्द कार्यवाही करण्यात यावी. परवाना दिला असेल तर मुख्य रस्त्यावरून स्थलांतर करावे.

श्री.दिलीप गायकवाड : गेल्या तीन वर्षापासुन वरिष्ट लिपीक पदावर पदोन्नती झाली आहे परंतु या कर्मचाऱ्यांना आतापर्यंत वेतनवाढ देण्यात आली नाही. त्याचे कारण काय.

मा.सभापती : उपआयुक्त(म)यांनी याबाबत खुलासा करावा.

उपआयुक्त(म) : वरिष्ट लिपीक या पदावर पदोन्नती झालेले साधारण ५४ कर्मचारी आहेत. त्या कर्मचाऱ्यांना एक वर्षाच्या परिविक्षा कालावधीवर ठेवण्यात आले होते.काही अटी शर्ती पुर्ण केल्यानंतर अशा कर्मचाऱ्यांना पुढील वेतनवाढ देतो.उदा विभागीय चौकशी,खाते चौकशी एमएससीआयटी परिक्षा उत्तीर्ण असणे या सर्व बाबी तपासून निर्णय घेतला जतो मागील महिन्याच्या अस्थापना विभागाच्या बैठकीत यावर निर्णय घेण्यात आलेला आहे.याबाबतची सुचिका स्वाक्षरीसाठी आलेली असताना यातील श्री.शेख जिलानी आणि श्री.विजयकुमार भाटी यांच्या नावावर काही चौकशी प्रलंबित

आहे माझ्या स्तरावर विचारणा करण्यात आली होती. त्यावर दोन दिवसात क्लियर होईल.

श्री.दिलीप गायकवाड : गेल्या तीन वर्षापासुन आपण त्याची वेतनवाढ देणार आहात का याचाही खुलासा करण्यात यावा.

मा.सभापती : वेतनवाढ देण्यात येणार आहे.

श्री.हिम्मतराव दाभाडे : आजया ठिकाणी महत्वाच्या तीन मुद्यावर मी बोलणार आहे. मा. न्यालयाच्या निर्णयानुसार अतिक्रमण हटविण्याची मोहिम हाती घेण्यात आली होती. त्या सदस्यांनी आडवण्याचा प्रयत्न केला तर सदस्यांवर केस करण्यात आली आहे त्यांना नोटीस देण्यात आली आहे.परंतु पीरबाजर येथे माजे उपमहापौर श्री.प्रकाश निकाळजेयांना दुध डेअरीकरीता जी परवानगी दिली आहे त्याच्या आजूबाजूला टपऱ्या पडल्या आहेत त्या हटविण्यात याव्यात म्हणून श्री.निकम साहेब यांना बऱ्याच वेळा विनंती केली आहे.परंतु त्या हटवलेल्या नाहीत. व्दारकापुरी येथे एक मोकळी जगा आहे. ही मोकळी जगा मनपा ची असतानाही श्री.शिंदे नावाच्या इसमाने त्यावर संरक्षित भिंत बांधलेली आहे.याबाबतही श्री.निकम साहेबांना विनंती केली पण त्यांचे त्याकडे लक्ष नाही. एकनाथनगर येथील डी पी जवळ पत्र्याचा शेड उभा करण्यात आला होता याबाबतही श्री.निकम साहेब यांना ते अतिक्रमण तोडण्यात यावे असे सांगितले.त्या पत्र्याच्या शेडचे आता भिंतीत रूपांतर झाले आहे. बांधकाम झालेले आहे.याला जबाबदार श्री.निकम साहेब आहेत अस मला वाटत. म्हणून विनंती करतो की,श्री.निकम साहेब अतिक्रमणमध्ये निष्क्रय असतील त्यांची त्वरीत बदली करण्यात यावी व दुसरा अधिकारी त्या ठिकाणी देण्यात यावा अशी माझी विनंती आहे.

मा.सभापती : सन्माननीय सदस्य श्री.दाभाडे यांनी जेमुद्दे उपस्थित केले आहेत, त्यावर श्री.निकम यांना सुचना देण्यात येते की,त्यावर त्वरीत कार्यवाही करून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल माझ्याकडे सादर करावा.

श्री.संजय शिरसाठ : व्दारकापुरीमध्ये मनपाची जे मोकळी जगा आहे त्या ठिकाणी संबंधीत इसमाने फेन्सींग केली आहे आणि त्या ठिकाणी झाडे लावली आहेत. ही मनपाची मोकळी जगा आहे ती ताब्यात घेण्यात यावी व मनपा मालकीचा बोर्ड लावण्यात यावा.

श्री.हिम्मतराव दाभाडे : ती मोकळी जगा त्यांनी मनपाच्या ताब्यात देण्याचा प्रयत्न केला.पण ते कुंपण श्री.शिंदे यांचे आहे का, महापालिकेचे आहे याचा खुलासा करण्यात यावा.

मा.सभापती : सर्व कायदेशीर बाबी तपासून उपआयुक्त(म)यांनी या प्रकरणात कार्यवाही करावी.

डॉ.आशा बिनवडे : सारंग सोसायटी येथील १०० फुट रस्त्यावरील सोसायटीच्या मोकळ्या जगेवर दीड वर्षापुर्वी एक टपरी लागलेली आहे.तो टपरी धारक मला मनपाने परवानगी दिलेली आहे असे सांगतो त्याच्याजवळ पावती पण आहे तेव्हा दीडवर्षापुर्वी टपऱ्याला परवानगी देण चालू होत का आणि त्या पावतीवर अंतर्गत रस्त्यावर परवानगी देण्यात येते असं लिहिल आहे पण त्याने १०० फुट रस्त्यावर टपरी लावलेली आहे. या संदर्भात मी उप आयुक्त(म), प्रशासकीय विभागाला सांगितले आहे पण ती टपरी अजून निघालेली नाही.

मा.सभापती : स.सदस्य डॉ बिनवडे यांनी सांगितलेल्या जगे संदर्भात नियमानुसार कार्यवाही होईल.

श्री.रविकांत गवळी : गेल्या ४/५ महिन्यापुर्वी मोठा गाजवाज करून आपण अतिक्रमण मोहिम सुरू केली. त्याची प्रसार माध्यम आणि सर्व स.सदस्यांनी त्याची प्रशंसा केली.ती मोहिम संपली अस जहिर केलेले नाही. ही मोहिम गरीब लोकांसाठी जे रोजंद्दारी पोट भरतात त्यांच्यासाठी चालू केली आहे अस मला वाटत. शहरात अनेक मोठ्या जगा आहे मोठे लोक आहेत त्यांनी २०/२५ वर्षापासुन अतिक्रमण केलेले आहे. त्यांच्यावर अद्याप पर्यंत काहीही कार्यवाही झालेली नाही. ती काढायची नाहीत का च्यावर कार्यवाही करणार नाहीत का. गेल्या दीड वर्षापासुन मी खामनदीत अतिक्रमण चालू आहे माझ्यापुर्वीच्या नगरसेवकांनी याबाबत बोलले आहेत त्याच्यावर भूसंपादन करायच,मार्कआऊट काढावयाचा,सिमांकन करावयाच,भूमि अभिलेखला पत्र दिलेले आहे,त्याचा अभिप्राय येतोय,पैसे द्यावयाचे आहेत ह्याच बाबी चालू आहेत. मग ते अतिक्रमण आपण काढणार नाहीत का. आज्ही त्याठिकाणी अतिक्रमण चालू आहे. जे अतिक्रमण झाले ते काढायचे नाही आणि जेचालू आहे ते थांबवायचे नाही.

मा.सभापती : श्री.निकम, प्रशासकीय अधिकारी यांनी पाहणी करावी आणि अहवाल द्यावा. खामनदी येथील अतिक्रमणाबाबत उपआयुक्त (म)यांनी खुलासा करावा.

श्री.संजय शिरसाठ : टी व्ही सेंटर येथील मैदानाची जगा रू.५०० प्रतिदिन या दराने आनंदनगरी साठी भाडे तत्वावर दिलेली आहे. ही जगा श्री.राजू खरे यांना मनपा अधिकाऱ्यावर दडपण आणुन देण्यात आली. अशी बातमी वृत्तपत्रात प्रसिध्द झालेली आहे. ती जगा ५०० रू दराने कशाच्या आधारे दिली. अतिक्रमण काढण्याची मोहिम ज्या वेळी सुरू झाली अनेक टपऱ्या उध्वस्त होत असताना त्याचे छायाचित्र,व्हिडीओ शुटींग दाखवल गेल त्यावेळी टपऱ्याचे या आपण पुनर्वसन करू शकतो का, त्यांना जगा देऊ शकतो का म्हणून क्रांतीचौक येथे मनपाची जी ९ एकर जगा आहे ती ताब्यात घ्या अशी सुचना दिली होती.ती जगा मनपा ताब्यात घेणार आहे म्हणून काही अधिकारी आणि लोकांनी जऊन तेथे जे रहिवासी होते त्यांना जऊन भेटले आणि त्यांना सांगितले की, तुमची जगा वाचवायची असेल तर प्रथम आम्हाला भेटा.आम्ही ती फाईल मनपात भेटत नाही अस सांगु शकतो. यावर काय कार्यवाही झाली तसेच क्रांतीनगर येथील अतिक्रमण काढल्यानंतर ही त्या ठिकाणी पुन्हा अतिक्रमण झालेले आहे.बाहेरगावचा एक नागरीक तेथे आला आणि चांगली जगा दिसते म्हणून त्या ठिकाणी अतिक्रमण करून बसला आहे. त्या ठिकाणी त्याने संसारही थाटला आहे. याचाही खुलासा व्हावा.

मा.सभापती : उपआयुक्त (म) यांनी या संदर्भात खुलासा करावा.

उपआयुक्त (म) : अतिक्रमण हटाव मोहिम थांबलेली नाही ती चालू आहे. जुन/जलै महिन्यात प्रशासनाने ही मोहिम युध्द पातळीवर हाती घेतेली होती. डी पी रोड मुख्य रस्ते यावरील वाहतुक सुरळीत करण्यासाठी आणि ज्यांना नोटीस देण्याची गरजनाही अशी अतिक्रमणे प्रथम काढण्यात आलेली आहेत.त्यानंतर विनापरवाना कामाबाबत नागरीकांच्या ज्या तक्रारी असतात त्याकडे प्रशासनाने आपला मोर्चा वळवला होता. मध्यंतरी पाऊस जस्त सुरू असल्यामुळे ज्या ठिकाणी लोक राहतात ती काढलेली नाही. खामनदीतील अतिक्रमणाबाबत त्याची हद्द निश्चित करून देण्याबाबत सिटी सर्वे ऑफीसला पत्र दिले आहे. त्याचा पाठपुरावा चालू आहे. खामनदीतील अतिक्रमणाबाबत त्या भागाचे सिमांकन करता येत नाही तोपर्यंत कार्यवाही करणे शक्य नाही.

श्री.रविकांत गवळी : माझ्या माहितीप्रमाणे तालुका भूमि अभिलेख यांना सिमांकन करण्यासाठी लेखी नोटीस दिलेली आहे. त्यांनी पैशाची मागणी केलेली आहे. अद्यापपर्यत आपण त्यांना पैसे दिलेले नाहीत. पैसे जमा होत नाही तोपर्यंत ते सिमांकन करू देत नाहीत.

मा.सभापती : याबाबत उपआयुक्त(म)यांनी खुलासा करावा.

उपआयुक्त (म) : सदर बाबीची माहिती आतातरी माझ्याकडे उपलब्ध नाही. पैशासाठी प्रलंबित असेल तर ती रक्कम आजच भरण्यात येईल.

मा.सभापती : आजचे आज रक्कम भरण्यात यावी. उपआयुक्त (म)यांनी आनंदनगरी बाबत खुलासा करावा.

उपआयुक्त (म) : स.सदस्य श्री.संजय शिरसाठ यांनी दोन मुद्दे उपस्थित केले होते. त्याप्रमाणे.. क्रांतीनगर येथील अतिक्रमण आज दुपारी काढण्यात येईल. क्रांतीचौक येथे लिजवर दिलेल्या जगेची संचिका सापडत नाही अशी कुठलीही परिस्थिती नाही. या ठिकाणी जे लिजधारक आहेत त्यांना मु.प्रा.मनपा अधिनियम १९४९ चे कलम ८१ (ब)प्रमाणे नोटीस दिली आहे. परंतु नोटीसची मुदत संपण्याच्या आतच ते न्यायालयात गेले आणि न्यायालयावरून या संदर्भात जैसे थे परिस्थिती कायम आहे.

श्री.संजय शिरसाठ : उपआयुक्त सभागृहाला चुकीची माहिती देत आहेत. क्रांतीचौक जगेची लिज १९८० साली संपलेली आहे. आज २००६ चालू आहे. असे असताना त्यांना नोटीस देण्याची गरजनाही. या जगेच्या एन.ए. पोटी ४२ लाख रूपये जिल्हाधिकारी कार्यालयात भरलेले आहेत. मनपाची जगा असताना ही तेथील लोकांनी त्येंचे नावाचे पी आर कार्ड बनवले आहे. मनपाला आज त्या जगेवरचे माणसच सापडत नाही. मनपाकडे त्याची रेकॉर्ड फाईल असेल तर सभागृहाला सांगा.

उपआयुक्त (म) : क्रांतीचौक येथील लिजवर दिलेल्या जगेची संचिका उपलब्ध आहे. आपण २००३ मध्ये कार्यवाही सुरू केली.

श्री.संजय शिरसाठ : उपआयुक्त यांनी या संचिकाधारकाच नांव द्यावे आणि त्याच्या प्लॉटचा एरिया द्यावा न्यायालयाचे जैसे थे आदेश ९ एकरासाठी दिलेला आहे का.

विधीसल्लागार : क्रांतीचौक येथील लिजवरील जगेबाबत श्री शहा व त्यांच्या सोबत इतर पाच यांनी न्यायालयात दावा दाखल केलेला आहे. क्रांतीचौक येथील लिजवर दिलेल्या जगेची संचिका माझ्याकडे उपलब्ध नाही. या प्रकरणात मा.न्यायालयाने जैसे थे आदेश दिला आहे.

श्री.संजय शिरसाठ : एखादी व्यक्ती एकतर्फी न्यायालयात गेल्यावर त्या प्रकरणात स्टेटस्को दिला जतो. या ठिकाणी स्टे कुठे आहे जे पर्यंत से दाखल होत नाही तोपर्यंत स्टेटस्को काढता येत नाही. तुमच्याकडे संचिका आली नाही अस म्हणता आणि उपआयुक्त त्यांच्याकडे संचिका आहे अस म्हणतात अस नेमक काय आहे.

विधी सल्लागार : अद्यापपर्यंत माझ्याकडे संचिका पोहचलेली नाही. जे पर्यंत संचिका माझ्याकडे येत नाही तोपर्यंत से दाखल करता येत नाही. प्रकरणी माहिती उपलब्ध करून से दाखल करण्यात येईल. दाव्यात प्रत्येकाचे नांव दिलेले आहे.

श्री.संजय शिरसाठ : क्रांतीचौक येथे मनपाची ९ एकर जगा आहे. या जगेची किंमत काही कोटी रूपयात आहे ती शहराच्या मध्यवर्ती भागात आहे. आपण अनेक ठिकाणी बी ओ टी करतो त्या ठिकाणी बी ओ टी करा. शहराच्या सौंदर्यात वाढ होईल. त्या ठिकाणी काही जगा

आपल्या ताब्यात आहे. परंतु त्या जगेची संचिकाच उपलब्ध नाही. क्रांतीचौक जगेबाबत नोटीसप्रमाणे मनपाने एन ए साठी जिल्हाधिकारी कार्यालयात भरणा केलेला आहे. त्याला काही आधार असेल. क्रांतीचौक येथील जगा ताब्यात घेण्यासाठी चांगल्या विधीज्ञाची नेमणूक करावी.

मा.सभापती : प्रकरण अतिशय गंभीर आहे. या प्रकरणात मा.आयुक्त यांनी स्वत: लक्ष घालून पुर्ण चौकशी करावी आणि पुढील सभेपर्यंत अहवाल द्यावा. स.सदस्य श्री.संजय शिरसाट यांच्या म्हणण्याप्रमाणे प्रकल्प उभा राहू शकतो का, याबाबत कार्यवाही करावी.

श्री.दिलीप गायकवाड : भारतमाता मंदिर येथे जे चित्रकला स्पर्धा चालू आहे त्या स्पर्धेचे उद्घाटन झालं आहे का त्याची कल्पना मनपा पदाधिकारी नगरसेवक यांना दिली का. याचा खुलासा करण्यात यावा.

उपआयुक्त (म) : मनपाच्या मालकीच्या शाळा किंवा इतर ज्या काही मालमत्ता आहेत त्या मालमत्ता आपण तात्पुरत्या स्वरूपात वेगवेगळ्या कारणासाठी देतो. उदा. गणेशोत्सव, गौरी गणपती किंवा कुठल्याही उत्सव किंवा समारंभासाठी सदर मैदान हे यापुर्वी सिडकोकडे होते. सिडको या मैदानासाठी दर दिवशी रू.२५०/- एवढे शुल्क आकारत होते. महानगरपालिका अशा मैदानासाठी दर दिवशी रू.५००/- शुल्क आकारते, रू.५००/- प्रतिदिन याप्रमाणे आपण वेगवेगळ मैदान भाड्याने देत असतो. याच पध्दतीने हे मैदान आनंद नगरीसाठी दिनांक २७.८.२००६ ते २६.९.२००६ या कालावधीसाठी भाड्याने दिलेले आहे. सदर रक्कम जवळ जवळ रू.३१.५०० मनपा कडे जमा करण्यात आली आहे.

श्री.संजय शिरसाठ : उपआयुक्त यांनी सांगितल्याप्रमाणे गणेश उत्सव आणि आनंद नगरी याचा काहीही संबंध नाही आनंदनगरी हा सामाजिक उत्सवाचा भाग नाही तो कमर्शियल उत्सव आहे.यात प्रत्येक स्टॉलधारकाकडून भाडे घेतले जते.सिडकोने काय केले याच्याशी काहीही संबंध नाही.आपण काय केले त्याचा बेस काय रू.५०० भाडे कोणत्या आधारावर आकारण्यात आले. त्यास स्थायी समितीची मान्यता घेतली आहे काय.

मा.सभापती :या संदर्भात उपआयुक्त यांनी खुलासा करावा.

उपआयुक्त (म) : वेगवेगळे दर यापुर्वी आपण निश्चित केले आहेत. जसे संत एकनाथ रंगमंदिर, वेगवेगळ्या शाळांचे मैदान ,किंवा गणपती उत्सवासाठी रू.१००/- अशाच आधारे हा रू.५००/- पुर्वी कधीतरी निश्चित केलेला आहे.

श्री.संजय शिरसाठ : सिडको आपल्याकडे हस्तांतर होऊन ४/५ महिने झाले आहेत .तेव्हा दर कोणत्या आधारावर घेतला आणि त्याला स्थायी समितीची मान्यता होती का

उपआयुक्त (म) : सदर दर हा आपण इतर महापालिकेच्या ग्राउंड लावता तो याला लावलेला आहे. याला स्थायी समितीची मंजुरी घेण्यात आली नाही.

श्री.संजय शिरसाठ : तर महापालिकेचा ओपन स्पेस आणि आपला हा स्पेस जे २/३ एकर आहे त्यासाठी इतर महापालिकेचे दर याच्याशी कसे कंम्पेअर केलेले आहेत. इतर महापालिकेकडे इतक्या मोठ्या जगेसाठी रू.५००/- दर आहे ते दाखविण्यात यावे.

सौ.लता दलाल : ही जगा गणेश उत्सवासाठी दिली का कमर्शियल वापरासाठी दिली होती याचा उपआयुक्त यांनी खुलासा करावा. आणि कर्मर्शियल वापरासाठी जगा द्यावयाची असेल

तर त्याला किती भाडे आकारले जते आणि यासाठी कोणत्या आधारावर तफावत दुर केली याचा खुलासा करण्यात यावा.

श्री.रविकांत गवळी : मनपाचे एखादे दुकान भाड्याने द्यावयाचे असेल तर आर आर दरानुसार देण्यात येते. सिडको तर्फे यासाठी रू.२५०/- दर आकारला जत होता आपण त्यासाठी ५०० रू.दर आकारला. तर सलीम अली सरोवरात मत्सउद्योगासाठी सिडको फक्त २० हजर घेत होते तर आपण ६ लाख ६५ हजर कसे काय घेतले.

डॉ.आशा बिनवडे : मनपाचे मैदान किंवा ग्राडंड जेव्हा आपण कमर्शियल कार्यक्रमासाठी देतो त्याचा रू.५००/- हा कधी ठरलेला दर आहे उपआयुक्त यांनी सांगितले. दर ठरवताना स्थायी समितीच्या मंजुरीची आवश्यकता नाही का.

मा.सभापती : या संदर्भात उपआयुक्त यांनी खुलासा करावा.

उपआयुक्त : ज्या तात्पुरत्या स्वरूपाच्या परवानगी दिल्या जतात त्या उपआयुक्त किंवा मा.आयुक्त यांच्या स्तरावर निर्णय घेवून देतो. जेदुकान कायमस्वरूपी १, ५ वर्षासाठी किंवा ३० वर्षासाठी असेल त्यावेळी स्थायी समितीची मंजूरी घेतो. हर्सुल तलाव मासेमारी पाच वर्षासाठी किंवा दुकान असेल तर वीस वर्षासाठी अशा प्रकारच्या मान्यतेसाठी स्थायी समितीकडे येतो. तात्पुरत्या परवानगी हा प्रशासन पातळीवर देण्यात येतात त्या कशा प्रकारे देतात याबाबत अभिलेख तपासुन सभेत माहिती देण्यात येईल.

श्री.संजय शिरसाठ : एम २ च ग्राऊंडसुध्दा आपण तात्पुरत्या भाड्याने देत होते ही बाब उपआयुक्त यांना माहित नाही असे वाटते त्या ठिकाणी लग्न सुध्दा होतात. त्याचे सुध्दा दर ठरलेले आहेत. संत एकनाथ रंगमंदिर सुध्दा आपण एक दिवसासाठी भाड्याने देतो. कायम भाड्याने देत नाही त्याचेही दर ठरलेले आहेत. त्याप्रमाणे रक्कम भरावी लागते. तेव्हा टी व्ही सेंटर जवळील मैदान कशाच्या आधारावर देण्यात आले होते. जर ते चुकीच्या आधारावर दिले असेल तर ताबडतोब त्याची परवानगी रद्द करण्यात यावी.

मा.सभापती : कुठल्या नियमाच्या आधारे याला परवानगी देण्यात आली स्थायी समितीची मान्यता घेणं आवश्यक आहे की,नाही नियमावली कुठे उल्लेख आहे की नाही याबाबत उपआयुक्त यांनी खुलासा करावा.

उपआयुक्त (म) : तात्पुरत्या स्वरूपाची जी परवानगी देण्यात येते ती प्रशासकीय स्तरावर देण्यात येते. याला स्थायी समितीची मंजुरी घेण्यात येत नाही.

सौ.लता दलाल : हे मैदान उत्सवासाठी दिले होत का कमर्शियल वापरासाठी दिले होते, याचा प्रथम खुलासा झाला पाहिजे तसेच नियमावलीत किंवा महापालिका ॲक्ट मध्ये कमर्शियल वापरासाठी काही दर दिलेले आहे का त्याला कुणाची तरी मंजुरी लागते यासाठी काही तरी नियमावली असेल आणि जर नसेल तर प्रशासनाने कोणत्या आधारे दर ठरवला किंवा कोणत्याही सभागृहाला विश्वासात न घेता कस ठरवल याचा खुलासा झाला पाहिजे

मा. सभापती : कुठल्या नियमाच्या आधारे ती परवानगी दिली? स्थायी समितीच्या मान्यतेची आवश्यकता आहे का, याचा खुलासा उप आयुक्त(म) यांनी करावा.

उप आयुक्त(म) : सदर मैदान उत्सवासाठी जसे इतर प्रसंगी परवानगी देतो त्या आधारे दिलेले आहे. यात कुठल्याही नियमाचा उल्लेख नाही. स्थायी समितीची मंजुरी घेत नाही. संचिकेत लिहिलेले आहे. अर्जदाराने दि.29.5.2006 रोजी प्रशासनाकडे जो अर्ज दिला होता

त्यामध्ये गणेशेत्सवानिमित्त आनंद गणेश मेळावा साजरा करण्यासाठी हे मैदान मागितले.

सौ.लता दलाल : आनंद मेळावा निमित्ताने तेथे स्टॉल लागलेले असतील की नाही याची माहिती संबंधीताने आपणास दिली किंवा नाही. नियमाचा कोणता आधार घेऊन त्यांना सूट दिली, कमर्शियल वापर होत असेल तर त्यासाठी कमर्शियल दर का आकारण्यात आले नाही?

श्री.संजय शिरसाट : मा.आयुक्त या प्रकरणात सक्षम असे उत्तर देतील अशी आशा आहे. वृत्तपत्रातील बातमीनुसार स्थानिक आमदाराच्या दबावाखाली हे मैदान दिले आहे. रू.500/- दर निश्‍चित करण्यास आधार काय? आणि रू.500/- दर असेल तर हे मैदान वर्षभरासाठी भाड्याने देतील काय?

श्री.जावेद कुरैशी : उप आयुक्तांनी जो खुलासा केला आहे त्यास सभागृहाचे सदस्य सहमत नाहीत. ज्या नियमाचे आधारे ते मैदान दिले तो नियमही ते दाखविण्यास तयार नाहीत.

श्री.मिलींद दाभाडे : स्थानिक आमदारांच्या मागे भरपूर काम आहे. त्यांना या प्रकरणात गोवण्यात येवू नये.

मा. सभापती : या प्रकरणात नियमावलीची पायमल्ली झालेली आहे असे सभागृहाचेउ मत आहे. या संदर्भात मा.आयुक्तांनी खुलासा करावा.

मा. आयुक्त : या संचिकेचा पूर्ण अभ्यास करून पुढील बैठकीत खुलासा करण्यात येईल.

मा. सभापती : टीव्ही सेंटरजवळील मैदानाची दिलेली परवानगी रद्द करण्यात येत आहे.

श्री.मो.जावेद मो.इसाक : शहरातील रस्त्यावरील लाईट दुरूस्तीसंबंधी दहा-दहा लाखाचे जे टेंडर काढण्यात आले आहेत ते आपण कोणत्या गुत्तेदारास दिले आहेत? ते सिव्हील काम करतात, त्यांना दिले, की लाईटचे काम जे करतात त्या गुत्तेदारांना दिले आहे. माझ्या माहितीप्रमाणे ज्या गुत्तेदाराला हे काम दिले आहे त्यांनी आज लावलेला लाईट दुसऱ्या दिवशी बंद होत आहे. तेव्हा हे दहा लाखाचे टेंडर सिव्हीलचे काम करणाऱ्या गुत्तेदारास दिले की लाईटचे काम करणाऱ्यांना दिले.

मा. सभापती : कार्यकारी अभियंता (विद्रेइवउ) यांनी खुलासा करावा.

श्री.संजय शिरसाट : त्याचबरोबर कार्यकारी अभियंता यांनी हा खुलासा करावा की आपण 250 वॅटची फिटींग काढतो त्या ठिकाणी कोणती फिटींग टाकतो.

कार्य.अभि.(विद्रेइवउ) : स.सदस्य श्री.मो.जावेद यांनी जो प्रश्न विचारला त्याचा खुलासा करण्यात येत आहे की, शहरातील लाईट दुरूस्तीबाबतचे एकही काम सिव्हील गुत्तेदाराला दिलेले नाही. ज्या गुत्तेदाराकडे विद्युत कामाची परवानगी आहे अशाच गुत्तेदाराला ती कामे दिलेली आहेत. दुसरे असे की, ज्या ठिकाणाहून 250 वॅटचा लाईट काढल्यानंतर त्या ठिकाणी 250 वॅटचाच लाईट टाकण्यात येतो. क्वचित प्रसंगी असं होऊ शकते.

श्री.मो.जावेद मो.इसाक : ज्या गुत्तेदाराना काम दिले त्यांच्यावर प्रशासनाचे नियंत्रण नाही. 10-10 लाखाचे काम ज्या गुत्तेदारांना देण्यात आले त्यांच्याकडे शिडीसुध्दा नाही. लाकडाची शिडी लावून हे लोक काम करतात. त्यांच्याकडे जास्तीचे उपकरणे(Iquipments) सुध्दा नाही. लाईटचे काम करावयाचे असेल तर नगरसेवकाला एमएसईबीकडे जाऊन लाईट बंद करण्यास सांगावे लागते. त्याच्या सोबत मनपाचा लाईनमन सुध्दा नसतो.

कार्य.अभि.(विद्रेइवउ) : मनपाचा प्रत्येक लाईनमन गुत्तेदारा बरोबर कामाच्या ठिकाणी जातो. लाईनमन गेला नाही तर कृपया निदर्शनास आणून द्यावे.

श्री.मो.जावेद मो.इसाक : आता आपण माझ्या वॉर्डात पाहणी करावी, त्या ठिकाणी शिडी लावून काम चालू आहे.

श्री.संजय शिरसाट : लाईटच्या कामाचा गुत्तेदार असे सांगतो की, हे सर्व बीओटी मध्ये होणार आहे. माझ्या वॉर्डात सध्या 95 ठिकाणी लाईट बंद आहेत. हे लाईट का दुरूस्त करण्यात येत नाही, अशी विचारणा केली असता खाजगीकरणातून ते दुरूस्त होणार आहेत असे सांगण्यात येते. लाईट चालू करण्याची सूचना केली तर एक दिवसात दोन लाईट चालू करतात आणि पुन्हा येतच नाहीत.

मा. सभापती : सर्व गुत्तेदारांनी योग्य पध्दतीने काम करावे. यावर कार्यकारी अभियंता (विड्रेइवउ) यांनी स्वतः लक्ष द्यावे.

श्री. मो.जावेद मो.इसाक : दुसरा प्रश्न असा आहे की, बीओटी तत्वावर जें लाईट मुख्य रस्त्यावर लावण्यात आले आहेत त्यांना किती रक्कम देण्यात येते. जर त्यांनी 100 लाईट लावले तर त्यांना 100 लाईटचे पैसे दिले जातात काय?

मा. सभापती : कार्यकारी अभियंता (विड्रेइवउ) यांनी खुलासा करावा.

कार्य.अभि. (विड्रेइवउ) : बीओटी चे टेंडर सर्वसाधारण सभेने मंजूर केलेले आहे.उ त्यावेळी सर्वसाधारण सभेत सविस्तर प्रस्ताव ठेवण्यात आला होता. त्यामुध्ये मनपा एकही पैसे बीओटी गुत्तेदारास देत नाही. गुत्तेदाराने स्वतःच्या खर्चाने लाईट बदलल्यानंतर लाईट बीलाची जी बचत होईल त्या बचतीच्या 77% गुत्तेदाराने आणि 23% मनपाने घ्यावयाचे अशा प्रकारचा तो ठराव आहे.

श्री.मो.जावेद मो.इसाक : गुत्तेदारातर्फे बीओटी वर जे लाईट लावण्यात येतात त्यापैकी 25% लाईट बंद आहेत.

मा. सभापती : विद्युत दिव्यांच्या देखभालीवर मनपा एवएज्ञ पैसा खर्च करत असताना अशा तक्रारी येता कामा नये. संबंधीत गुत्तेदार नीट काम करण्यास तयार नसेल तर त्याच्याविरूध्द कार्यवाही करण्यात यावी.

श्री.मो.जावेद मो.इसाक : मनपा प्रांगणात चांगल्या प्रकारचे सिमेंट ब्लॉब बसविण्यात आलेलेआहेत. परंतु शहराच्या अनेक भागात निकृष्ट दर्जाचे पेव्हर ब्लॉक बसविलेले आहेत. तेव्हा मनपा प्रांगणात ज्याप्रमाणे चांगल्या दर्जाचे पेव्हर ब्लॉक बसविले आहेत त्याच प्रकारचे पेव्हर ब्लॉक शहरात गल्ल्यामध्ये, रोडवर बसविण्यात यावेत.

सौ.लता दलाल : सारस्वत बँकेसमोरच्या जागेची नगरपालिकेच्या वेळेपासून जी केस चालू होती त्याचा निकालही लागलेला आहे. स्थगितीही उठलेली असून मनपाने तेथील अतिक्रमण हटवून ती जागा अद्याप ताब्यात घेतलेली नाही. ही बाब वारंवार उप आयुक्त(म) यांच्या निदर्शनास आणूनही उप आयुक्त(म) हे सहा.संचालक नगर रचना यांच्यावर आणि सहा.संचालक नगर रचना हे प्रशासकीय विभाग आणि प्रशासकीय विभाग, बांधकाम विभागावर टोलवत आहेत. याचा अर्थ असा मनपा प्रशासन, अधिकारी यांना ही जाबा ताब्यात घेऊन शहराचा विकास करावा असे वाटत नाही का? एमएसआरडीसी चे 60 लाख रूपये परत गेले आहेत, यास कोणाला जबाबदार धरणार.

मा. सभापती : या संदर्भात उप आयुक्त (म), प्रशासकीय अधिकारी यांनी त्वरीत कार्यवाही करावी अशा सूचना देण्यात येत आहेत.

सौ.लता दलाल : नागेश्वरवाडी येथील अतिक्रमणाबाबत किती दिवसात कार्यवाही करण्यात येणार याबाबत माहिती देण्यात यावी. अन्यथा नाईलाजाने मला या सभागृहात उपोषणास बसण्याची वेळ येईल.

मा. सभापती : उप आयुक्त(म), सहा.संचालक नगर रचना यांनी या प्रकरणी ावश्यक असलेली कार्यवाही एकत्रितरित्या करावी. पुढील बैठकीपुर्वी यावर कार्यवाही होणे अपेक्षित आहे.

श्री.रविकांत गवळी : भूसंपादनाचा मोबदला द्यावयाचा असेल तर तो विषय सर्वसाधारण सभेत येणे गरजेचे आहे. 127 च्या द्वारे दिलेली नोटीस असेल तर तो विषय सर्वसाधारण सभेपुढे येणे गरजेचे आहे किंवा नाही याचा खुलासा करावा. स.नं.228, 229 मध्ये पावणेदोन एकर आरक्षित जमीनीचा मोबदला सर्वसाधारण सभा किंवा स्थायी समीसमोर विषय न आणता देण्यात आलेला आहे. तो कोणत्या नियमात दिला आहे याचा खुलासा करण्यात यावा. जटवाडा रोडवरील स.नं.228, 229 चा मोदबला देण्याचे प्रकरण आहे.

मा. सभापती : सहा.संचालक नगर रचना यांनी या प्रकरणात खुलासा करावा.

सहा.संचालक न.र. : जटवाडा रोडवरील प्रकरणाबाबत माहिती घेऊन पुढील सभेत सांगण्यात येईल.

मा. सभापती : या प्रकरणी पुढील बैठकीत खुलासा करण्यात यावा.

श्री.मिलींद दाभाडे : 10 सप्टेंबर रोजी संपूर्ण भारतात पोलिओ डोस देण्यात आला. पण काही केंद्रांवर सकाळी 10 वाजेपर्यंत डोस पुरविण्यात आला नाही. त्या बेजबाबदार व निष्क्रीय अधिकाऱ्यावर काही कार्यवाही करण्यात आली आहे का किंवा करण्यात येणार आहे का, खुलासा करण्यात यावा.

मा. आयुक्त : ज्या वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या कक्षेतील तीन केंद्रावर वेळेवर लस पोचली नाही आणि फिलजरचा प्रॉब्लेम आला होता त्या त्या वैद्यकीय अधिकाऱ्यांवर कार्यवाही करण्याच्या सूचना आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांना दिल्या आहेत.

श्री.त्रिंबक तुपे : स.सदस्य श्री.दिलीप गायकवाड यांनी जो प्रश्न विचारला होता की, शिक्षण विभागाच्या वतीने ज्या चित्रकला स्पर्धा घेण्यात येत आहेत किंवा घेण्यात आल्या आहेत त्याची माहिती वृत्तपत्रातून वाचली. त्याचा खर्च किती झाला, त्या स्पर्धा कधी घेतल्या याबाबत माहिती घेण्यात यावी.

मा. सभापती : सांस्कृतिक अधिकारी यांनी या संदर्भात खुलासा करावा.

श्री.संजय शिरसाट : स.सदस्य श्री.त्रिंबक तुपे यांनी जो प्रश्न उपस्थित केलाआहे याबाबत मा.आयुक्तांनाही माहिती नाही. या स्पर्धासाठी सांस्कृतिक अधिकारी यांनी जवळपास दीड लाखाचा खर्च केला. याबाबत मा.महापौर यांनी चौकशी केली असता ही बाब प्रशासकीय आहे. नगरसेवकांचा काही संबंध या स्पर्धाशी नाही असा खुलासा सांस्कृतिक अधिकारी यांनी केला. याबाबत मा.आयुक्तांशी संपर्क साधला असता ही बाब मला माहित नाही असा खुलासा करण्यात आला. या संदर्भात मा.आयुक्त यांचाही खुलासा अपेक्षित आहे.

मा. सभापती : सांस्कृतिक अधिकारी यांनी खुलासा करावा.

सांस्कृतिक अधिकारी : भारतमाता मंदिर अस्तित्वात आलं तेव्हापासून 9 ऑगष्ट या क्रांती दिनानितिमत्त शालेय पातळीवर विद्यार्थ्यांच्या स्पर्धा या ठिकाणी घेत असतो. 9 ऑगष्टला भारतमातेच्या प्रतिमेचे पूजन करून स्पर्धांना आपण त्या ठिकाणी प्रारंभ करत असतो. बक्षीस वितरणाचा कार्यक्रम सर्व स.पदाधिकारी, सर्व स.नगरसेवक, अधिकारी यांना निमंत्रित करून करत असतो. यंदा सतत पावसामुळे आपण हा कार्यक्रम पुढे ढकलला व 12 तारखेला त्या ठिकाणी सुरू केला. क्रांतीदिनाचा हा कार्यक्रम पाच दिवसाचा असतो. या काळात त्या ठिकाणी स्वगत, वेशभूषा, समुहगान, चित्रकला आणि क्रांतीकारकांच्या माहितीवरील प्रश्नमंजुषा अशा प्रकारचे उपक्रम घेतले

जातात. या स्पर्धासाठी प्रशासकीय स्तरावर संचिका कार्यान्वित केली होती. त्यास मा.उप आयुक्त यांची मान्यता मिळालेली होती. या मान्यतेनुसार कार्यक्रम निश्चित करण्यात आले. या कार्यक्रमासाठी रू.50 हजाराचा खर्च प्रस्तावित करण्यात आला होता. त्यापैकी आतापर्यंत यावर एकही पैसा खर्च करण्यात आला नाही. शालेय विभागाच्या क्रिडा स्पर्धा घेणे हे माझ्या विभागाचे काम नाही. या संदर्भात कोणताही दीड लाखाचा खर्च मी केलेला नाही. माझ्या विभगातर्फे बारावी मध्ये उत्तीर्ण झालेल्या गुणवंतांचा सत्कार हा एकच कार्यक्रम घेण्यात आलेला आहे. यावर 20 हजार रूपये खर्च करण्यात आलेला आहे. या व्यतिरिक्त 2006-2007 या आर्थिक वर्षात या विभागाकडून काहीही खर्च करण्यात आलेला नाही.

श्री.संजय शिरसाट : सभागृहात खुलासा केल्याप्रमाणे 9 तारखेचा कार्यक्रम 12 तारखेला घेण्यात आला त्यात पाच स्पर्धा होत्या तर त्याची माहिती मा.महापौर, मा.आयुक्त यांना देण्यासारखे का वाटत नाही. या मनपात एखादा कार्यक्रम घ्यावयाचा असेल तर त्याची माहिती पदाधिकारी, नगरसेवक यांना नको का. कार्यक्रमाची संचिका उप आयुक्त यांच्यामार्फत चालली आणि त्यावर एकही पैसा खर्च झालेला नाही म्हणजे त्या ठिकाणी जो काही खर्च झालेला आहे त्याचे बील देण्याची आवश्यकता नाही. तरी या कार्यक्रमासाठी संचिका मंजूर करून घेण्यात आली असा त्याचा अर्थ आहे का?

मा. सभापती : या संदर्भात सांस्कृतिक अधिकारी यांनी खुलासा करावा.

सांस्कृतिक अधिकारी : या स्पर्धांवर अजून खर्च केलेला नाही असा खुलासा केला. परंतु अजून स्पर्धा चालू आहेत. त्याचे बक्षिस वितरण अद्याप बाकी आहे. या स्पर्धामध्ये विद्यार्थ्यांना जी रोख रक्कमेची पारितोषिके देण्यात येतात त्याबद्दलची कोणतीही रोख रक्कम अथवा परिक्षकांचे मानधन अद्याप दिलेले नाही. म्हणून या स्पर्धांवर आतापर्यंत खर्च करण्यात आला नाही, असा खुलासा केलेला आहे.

श्री.संजय शिरसाट : माझा सर्वात महत्वाचा प्रश्न आहे की, मनपामध्ये कोणत्याही विभागात कोणताही कार्यक्रम घ्यावयाचा असेल तर त्याची कल्पना मा.आयुक्त, सर्व पदाधिकारी यांना असली पाहिजे. ज्या वॉर्डात हा कार्यक्रम घेण्यात येत असेल त्या प्रभागाच्या आजुबाजूला नगरसेवक, सभापती आहेत त्यांनाही जर याची कल्पना नसेल तर हे कार्यक्रम कशाच्या आधारावर घेतात.

मा.सभापती : कार्यक्रमासंबंधी स.नगरसेवक, स.पदाधिकारी यांना का कळवावं वाटलं नाही याचा खुलासा सांस्कृतिक अधिकारी यांनी करावा.

सांस्कृतिक अधिकारी : 12 तारखेला सर्वसाधारण सभा होती. या कार्यक्रमास स.सदस्य संजय जोशी व स.शिक्षण समिती सभापती विजय खुडे उपस्थित होते. औपचारिक कार्यक्रम होता. बक्षीस वितरण कार्यक्रमाची जबाबदारी स.सदस्य श्री.संजय जोशी यांनी घेतलेली होती.

श्री.त्रिंबक तुपे : स.सदस्यांनी जबाबदारी घेतली तर संबंधीत अधिकाऱ्यांची जबाबदारी नाही का.

मा. आयुक्त : वेगवेगळ्या विभगाकडून विविध स्तरावर कार्यक्रम दरवर्षी होत असतात. त्यासाठी विभाग प्रमुखांना 2.50 लाखाचे अधिकार देण्यात आले आहेत. असे 2.50 लाख किंवा त्यापेक्षा कमी खर्चाचे कार्यक्रम उप आयुक्त यांच्या मंजुरीने होतात. असे जे कार्यक्रम होतात त्या कार्यक्रमाची माहिती सर्व स.पदाधिकारी, सर्व स.नगरसेवक यांना दिली गेली पाहिजे. याची काळजी संबंधीत विभग प्रमुख, शाखा प्रमुख यांनी घ्यावी.

श्री.हिंमतराव दाभाडे : मागील सभेत आणि त्यापुर्वीच्या सभेत सुध्दा या प्रश्नावर चर्चा झालेली आहे की, मुथियान कॉर्नर येथे श्री.माधव तुळशीराम घोरपडे यांनी जे अतिक्रमण केले आहे त्याचे कागदपत्र दाखल केले आहेत किंवा नाही याचा खुलासा करावा.

मा. सभापती : उप आयुक्त(म) यांनी खुलासा करावा.

उपआयुक्त(म) : श्री.माधव तुळशीराम घोरपडे यांच्या अतिक्रमणा संदर्भात सर्व कागदपत्र उप आयुक्त (म) या कार्यालयाकडे प्राप्त झाले आहेत. यासंदर्भात अंतिम सुनावणीसाठी प्रकरण 20 तारखेला ठेवण्यात आले आहे.

श्री.विनायक पांडे : शहरात चालू असलेल्या एएमटी बस बाबत गेल्या दोन महिन्यापासून मी पत्र देत आहे की, बेगमपुरा भागात 3/4 कॉलेज, डीएड् कॉलेज, आसाराम बापु यांचा आश्रम, संत गुरूमिश्री यांचे मोठे स्थान याशिवाय भगवान गौतमबुध्द यांची लेणी, औरंगाबाद लेणी असे विविध ठिकाणे आहेत. जुन्या सिटीबसच्या वेळी त्या ठिकाणी बस चालत होत्या. तेव्हा या भागात अग्रक्रमाने एएमटी बस सुरू करावी. या भागात येणारे विद्यार्थी, आश्रमात येणारे भाविक यांच्यासाठी या भागात बस सेवा सुरू करण्यात यावी.

श्री.संजय शिरसाट : एक सूचना अशीआहे की, एएमटी बसचा जो करार झाला तो नेमका काय करार झाला आहे. पण या संदर्भात एएमटीचे काम पाहणारे संबंधीतांनी संपूर्ण माहिती पुढील सभेत उपलब्ध ठेवावी.

मा. सभापती : पुढील सभेत या विषयावर सविस्तर चर्चा घेण्यात येईल. या विषयीची सर्व उत्तरे देण्यासाठी खाजगी संस्थेच्या संबंधीतास निमंत्रित करण्यात यावे. त्याच बरोबर मनपाचे अधिकारी यांनीही माहिती देण्यासाठी तयारी करून यावे.

श्री.दिलीप गायकवाड : सलीम अली सरोवरात जे मासे मेले ते कशामुळे मेले याचा खुलासा करण्यात यावा.

मा. सभापती : विषय क्रमांक 94 .....

**<u>विषय क्र.94 :</u>**

अतिरिक्त शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, भावसिंगपुरा ते पडेगांव कत्तलखान्याकडे जाणाऱ्या रस्त्याचे पुनर्डांबरीकरण करणेच्या कामाचे सा.बां.खात्याच्या सन 2005-06 च्या दरसूचीनुसार रक्कम रू.14,49,910/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च 2006-07 या आर्थिक वर्षात पुनःडांबरीकरण या लेखाशिर्षातून करण्यात येत आहे. प्रस्तुत अंदाजपत्रकास मा.आयुक्तांनी शिफारस केली आहे व मा.स्थायी समिती सभेची मंजुरी घेणेबाबत आदेशित केले आहे.

तरी रक्कम रू.14,49,910/- चे अंदाजपत्रक मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**<u>संवाद :</u>**

श्री.मिलींद दाभाडे : या विषयाला स्थगिती देण्यात यावी. बंधारे, नाली घेणे आवश्यक आहे. त्याची तरतूद अंदाजपत्रकात नाही.

मा. सभापती : स.सदस्य श्री.मिलींद दाभाडे यांनी ज्या सूचना केल्या आहेत त्याचे सुधारीत अंदाजपत्रक तयार करून सभेपुढे ठेवण्यात यावे. या अंदाजपत्रकाला मंजुरी देण्यात येते.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे भावसिंगपुरा ते पडेगांव कत्तलखान्याकडे जाणाऱ्या रस्त्याचे पुनर्डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रू.14,49,910/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.95 :</u>**

अतिरिक्त शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, वॉर्ड क्र.13 विश्वासनगर येथील उध्दवराव पाटील चौक ते हनुमान मंदीर या डी.पी. रस्त्याचे रूंदीकरण व डांबरीकरण करणेच्या

कामाचे सा.बां.खात्याच्या सन 2005-06 च्या दरसूचीनुसार रक्कम रू.12,90,500/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च 2006-07 या आर्थिक वर्षात नवीन डांबरी रस्ते या लेखाशिर्षातून करण्यात येत आहे. प्रस्तुत अंदाजपत्रकास मा.आयुक्तांनी शिफारस केली आहे व मा.स्थायी समिती सभेची मंजुरी घेणेबाबत आदेशित केले आहे.

तरी रक्कम रू. 12,90,500/- चे अंदाजपत्रक मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.13 विश्वासनगर येथील उध्दवराव पाटील चौक ते हनुमान मंदीर या डी.पी. रस्त्याचे रूंदीकरण व डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू. 12,90,500/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.96 :**

अतिरिक्त शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, वॉर्ड क्र.24 चिकलठाणा एमआयडीसी अंतर्गत पॉवरलुम ते विवेकानंद हायस्कुल रस्त्याचे पुनःडांबरीकरण करणेच्या कामाचे सा.बां.खात्याच्या सन 2005-06 च्या दरसूचीनुसार रक्कम रू.14,96,970/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा समावेश सन 2006-07 च्या अर्थसंकल्पात पुनःडांबरीकरण या लेखाशिर्षकाखाली करण्यात आलेला असून कामाकरीता आर्थिक तरतुद उपलब्ध आहे.

तरी रक्कम रू. 14,96,970/- चे अंदाजपत्रक मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.24 चिकलठाणा एमआयडीसी अंतर्गत पॉवरलुम ते विवेकानंद हायस्कुल रस्त्याचे पुनःडांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.14,96,970/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.97 :**

अतिरिक्त शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, वॉर्ड क्र.94 बन्सीलालनगर अंतर्गत जालाननगर येथील 12 मी. रूंद रस्त्याचे पुनःडांबरीकरण करणेच्या कामाचे सा.बां.खात्याच्या सन 2005-06 च्या दरसूचीनुसार रक्कम रू.14,97,000/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा समावेश सन 2006-07 च्या अर्थसंकल्पात पुनःडांबरीकरण या लेखाशिर्षकाखाली करण्यात आलेला असून कामाकरीता आर्थिक तरतुद उपलब्ध आहे.

तरी रक्कम रू. 14,97,000/- चे अंदाजपत्रक मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.94 बन्सीलालनगर अंतर्गत जालाननगर येथील 12 मी. रूंद रस्त्याचे पुनःडांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.14,97,000/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.98 :**

अतिरिक्त शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, वॉर्ड क्र.95 पदमपुरा अंतर्गत 12 मी. रूंद रस्त्याचे पुनःडांबरीकरण करणेच्या कामाचे सा.बां.खात्याच्या सन 2005-06 च्या दरसूचीनुसार रक्कम रू.14,98,300/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा समावेश सन 2006-07 च्या अर्थसंकल्पात पुनःडांबरीकरण या लेखाशिर्षकाखाली करण्यात आलेला असून कामाकरीता आर्थिक तरतुद उपलब्ध आहे.

तरी रक्कम रू. 14,98,300/- चे अंदाजपत्रक मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.95 पदमपुरा अंतर्गत 12 मी. रूंद रस्त्याचे पुनःडांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आपल्या रक्कम रू.14,98,300/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.99:**

अतिरिक्त शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, वॉर्ड क्र.24 एन-1 सेक्टर अंतर्गत रस्त्याचे पुनःडांबरीकरण करणेच्या कामाचे सा.बां.खात्याच्या सन 2005-06 च्या दरसूचीनुसार रक्कम रू.11,99,130/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा समावेश सन 2006-07 च्या अर्थसंकल्पात नवीन डांबरी रस्ते या लेखाशिर्षकाखाली करण्यात आलेला असून कामाकरीता आर्थिक तरतुद उपलब्ध आहे.

तरी रक्कम रू. 11,99,130/- चे अंदाजपत्रक मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.24 एन-1 सेक्टर अंतर्गत रस्त्याचे पुनःडांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.11,99,130/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.100:**

अतिरिक्त शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, वॉर्ड क्र.37 अंतर्गत विविध रस्त्यांचे डांबरीकरण करणेच्या कामाचे सा.बां.खात्याच्या सन 2005-06 च्या दरसूचीनुसार रक्कम रू.14,97,100/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च 2006-07 या आर्थिक वर्षात शहरी भागात नवीन डांबरी रस्ते या लेखाशिर्षातून करण्यात येत आहे. प्रस्तुत अंदाजपत्रकास मा.आयुक्तांनी शिफारस केली आहे व मा.स्थायी समिती सभेची मंजुरी घेणेबाबत आदेशित केले आहे.

तरी रक्कम रू.14,97,100/- चे अंदाजपत्रक मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र. 37 अंतर्गत विविध रस्त्यांचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.14,97,100/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.101:**

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, श्री.एम.पी.खैरनार, मुख्य लेखाधिकारी (मयत) यांना कार्यालयातर्फे कर्करोग उपचारासाठी वैद्यकीय खर्च प्रतिपूर्ती देयक मंजूर झालेले व द्यावयाचे आहे, त्याबाबतचा तपशील खालील प्रमाणे दर्शविण्यात येत आहे.

| अ.क्र. | अनुज्ञेय रक्कम (रूपये) | 80% देय रक्कम (रूपये) | अदा केलेली तारीख |
|---|---|---|---|
| 1 | 1,19,391/- | 95,513/- | 16/3/2006 |
| 2 | 3,19,484/- | 2,55,587/- | 21/3/2006 |
| 3 | 2,30,290/- | 1,84,232/- | 20/4/2006 |
| 4 | 2,12,215/- | 1,69,772/- | 10/5/2006 |
| 5 | 2,43,502/- | 1,94,801/- | 09/6/2006 |
| 6 | 2,13,157/- | 1,70,525/- | 07/7/2006 |
| 7 | 3,45,124/- | 2,76,099/- | **अदा करणे बाकी आहे.** |
| | एकूण रू. 16,83,163/- | एकूण रू. 13,46,529/- | |

उपरोक्त प्रमाणे अनुज्ञेय रक्कमेच्या 80% रक्कम श्री.एम.पी.खैरनार, यांना अ.क्र.1 ते 6 नुसार रू.10,70,430/- यापुर्वीच अदा केलेली आहे. श्री.एम.पी.खैरनार यांचे दि.24-7-2006 रोजी निधन झाल्यामुळे केमोथेरपीच्या शेवटच्या उपचाराचे देयक अ.क्र.7 मध्ये दर्शविलेले अनुज्ञेय रक्कमेच्या 80% रक्कम रू.**2,76,099**/- संबंधीताच्या वारसाच्या नांवे अदा करण्याच्या मान्यतेंस्तव तसेच एकत्रित वैद्यकीय प्रतिपूर्ती खर्च रू.**13,46,529**/- कार्योत्तर मान्यतेस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्री.एम.पी.खैरनार, मुख्य लेखाधिकारी (मयत) यांना कार्यालयातर्फे कर्करोग उपचारासाठी वैद्यकीय खर्च प्रतिपूर्ती देयक मंजूर झाल्यानुसार, अनुज्ञेय रक्कमेच्या 80% अदा करण्यात आलेल्या

रक्कम रू.10,70,430/- (अ.क्र.1 ते 6) ला मान्यता देण्यात येते. तसेच श्री.एम.पी.खैरनार यांचे दि.24-7-06 रोजी निधन झाल्यामुळे, केमोथेरपीच्या शेवटच्या उपचाराचे देयकाची (अ.क्र.7 मध्ये दर्शविल्यानुसार) 80% रक्कम रू.**2,76,099/-(दोन लक्ष शहात्तर हजार नव्याण्णव)** संबंधीताच्या वारसाच्या नांवे अदा करण्यास आणि एकत्रित वैद्यकीय प्रतिपूर्ती खर्च रू.**13,46,529/- (तेरा लक्ष सेहेचाळीस हजार पाचशे एकोणतीस)** ला कार्योत्तर मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.102:**

कार्यकारी अभियंता (ड्रेविइवउ) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, वॉर्ड क्र.64 मध्ये झांबड इस्टेट येथील खुल्या जागेत बॅडमिंटन हॉल बांधणे करीता सा.बां.विभागाच्या सन 2004-05 च्या जिल्हा दरसुचीनुसार रक्कम रू.12,00,000/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते, त्यास मा.आयुक्तांनी मान्यता दिलेली आहे.

सदरील कामाचा खर्च सन 2006-07 या आर्थिक वर्षाअंतर्गत "विकास योजने अंतर्गत भूखंडाचे संरक्षण" या लेखा शिर्षकातून 10.00 लक्ष रूपये व पान क्र. W-119 अ.क्र.8 नुसार रू.2.00 लक्ष वळती केलेल्या तरतूदीतून करण्यात येईल. सदरील लेखाशिर्ष बदलास मा.सर्वसाधारण सभेने दि.11-8-2006 रोजीच्या बैठकीत सर्वानुमते मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार सदरील कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.12,00,000/- चा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.64 मध्ये झांबड इस्टेट येथील खुल्या जागेत बॅडमिंटन हॉल बांधणे करीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.12,00,000/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**ऐनवेळचे विषय**

**विषय क्र.103:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, महानगरपालिका हद्दीबाहेरील 5 कि.मी. परिसरातील वसाहतींना महानगरपालिकेतर्फे पाणी पुरवठा करावयाचे शासनाचे आदेश आहेत. त्यानुसार सातारा देवळाई परिसरात पाणी पुरवठा योजना करणे अपेक्षीत आहे. सदर परिसराची लोकसंख्या व पाण्याची मागणी पाहता भुपृष्ठावरील उद्‌भवाचीच आवश्यकता असून, त्यासाठी जवळच्या खात्रीलायक उद्‌भवाची तपासणी करणे, उद्‌भव क्षमता व पाण्याची भविष्यातील गरजेनुसार उपलब्धता तपासणी, योग्य उद्‌भवावरून सविस्तर सर्वेक्षण करणे, त्यानुषंगाने सविस्तर अंदाजपत्रके व आराखडे तयार करणे, सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करणे तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून प्रस्तावास मान्यता प्राप्त करणे इत्यादी बाबींची पुर्तता करणे आवश्यक आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून मान्यता प्राप्त झाल्यावर निविदा प्रक्रीयाबाबत कार्यवाही करण्यात येईल.

करीता सातारा परिसरातील कायमस्वरूपी पाणी पुरवठा योजना आखण्याचे दृष्टीने स्त्रोत तपासणी, सर्वेक्षण, आराखडे, अंदाजपत्रके तयार करणे, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून मान्यता घेणे व निविदा प्रक्रियेची कार्यवाही करणे बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

मा. सभापती : सातारा परिसराला पाणी पुरवठा करण्यासाठी सर्वेक्षण करणे अत्यंत गरजेचे आहे. ते त्वरीत व्हावे या संदर्भाने हा प्रस्ताव आलेला आहे.

सौ.लता दलाल : या प्रस्तावाच्या अनुषंगाने एक सूचना अशी आहे की, प्रथम संपूर्ण शहरातील पाणी पुरवठ्याची परिस्थिती सुधारण्यात यावी. त्यानंतर यासाठी समांतर लाईन टाकण्यात येणार असली तरी या शहराच्या पाणी पुरवठ्यात कुठल्याही प्रकारचा व्यत्यय येणार नाही या पध्दतीने सर्व्हे करण्यात यावा.

श्री.रविकांत गवळी : या सर्व्हे बरोबरच शहराला पूर्ण वेळा आपण पाणी पुरवठा करू शकत नाही त्याचा सर्व्हे करण्यात यावा.

श्री.त्रिंबक तुपे : सातारा भागास पाणी पुरवठ्याचा विषय आहे, त्यात मनपा हद्दीचा काही विषय नाही का. याचाही विचार करणे आवश्यक आहे. हा परिसर मनपा हद्दीत कसा घेता येईल याचा प्रथम विचार करावयास पाहिजे.

श्री.रविकांत गवळी : दहा वर्षापुर्वी एखाद्या वसाहतीस आपण 100 एमएम पाणी पुरवठा लाईन टाकलेली असेल आणि आज त्या वसाहतीस पाणी पुरवठा होत नसला व त्यासाठी 150 किंवा 200 एमएम लाईन

टाकावयाची असेल तर आपण त्या ठिकाणी मोठ्या व्यासाची पाईपलाईन टाकू शकत नाही, अशी माहितील आम्हाला मिळते.

मा. सभापती : प्रथम मा.आयुक्त यांना खुलासा करू द्यावा. त्यानंतर स.सदस्यांनी प्रश्न उपस्थित करावे.

मा. आयुक्त : नियमाप्रमाणे शहराच्या हद्दीचे बाहेर 5 कि.मी. पर्यंत पाणी पुरवठा करण्याची जबाबदारी मनपाची असते. शहराला लागणारे पाणी उचलून आणत असून पाणी कमी पडत असल्यामुळे मनपा हद्दी बाहेर मनपा पाणी देत नाही. याबाबत सातारा ग्रामपंचायत बरोबर जी बैठक झाली त्यावेळी मनपाकडे पाणीच नाही असे सांगण्यात आले असता ग्रामपंचायतने दुसऱ्या सोर्समधून पाणी देण्याची मागणी केली. त्यावेळी याचा पूर्ण अभ्यास करून तेथून 12 किंवा कमीत कमी 10 महिने पाणी मिळाले पाहिजे त्याचा अभ्यास करण्यासाठी मनपा 50% व ग्रामपंचायत 50% खर्च करावा असे ठरले. यासाठी ग्रामपंचायतने 2.50 लाख मनपाकडे दिले आहेत. त्याप्रमाणे खर्च करून सर्वे नंतर वेगळ्या सोर्समधून पाणी पुरवठा करता येईल का, याचा विचार केला जाईल.

श्री.रविकांत गवळी : ठरावास आमचा विरोध नाही.

मा. सभापती : सातारा परिसरातील पाणी पुरवठा संदर्भात दक्षता कमिटीमध्ये हा विषय आला होता. सर्व जेष्ठ नेत्यांनी यात स्वतः लक्ष घातले. सातारा परिसराला पाणी देण्याचा प्रयत्न करत आहोत. या संदर्भात हा ठराव आपल्याकडे आलेला आहे. या संदर्भात चांगली एजन्सी नियुक्त करून सर्व्हेचे काम त्वरीत सुरू करण्यात यावे अशा सूचना मा.आयुक्तांना देण्यात येत आहेत.

श्री.साहेबराव कावडे : मनपातर्फे ग्रामीण भागात 5 कि.मी. अंतरापर्यंत पाणी देण्यात येते तर गुंठेवारीमध्ये मनपाला पाणी देण्यास काय हरकत आहे? शासनाच्या अनुदानातून गुंठेवारीमध्ये पाणी द्यावे. चालू वर्षात किती अनुदान आले.

मा. आयुक्त : गुंठेवारी भागात मनपा टँकरद्वारे पाणी देत आहे. गुंठेवारी भागात मनपा पाणी पुरवठा करण्यास तयार आहे पण त्यापुर्वी गुंठेवारी रेग्युलाईज करून घ्यावी लागेल. त्यासाठीच गुंठेवारी रेग्युलाईज करण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. त्यानंतर गुंठेवारी भागात पाणी व इतर सुविधा देणे मनपाला शक्य होईल. झोपडपट्टी भागास पाणी पुरवठा करण्यात येतो. सातारा भागास वेगळ्या सोर्समधून पाणी देता येईल का याचा अभ्यास करण्यासाठी हा प्रस्ताव आलेला आहे.

श्री.त्रिंबक तुपे : सातारा गांव वगळता इतर भागासाठी गुंठेवारी प्रमाणे पैसे वसुल केले जातील का, या भागात अनेक ठिकाणी अनधिकृतपणे नागरीक वसलेले आहेत.

मा. आयुक्त : आता फक्त सर्व्हे करण्याचा प्रस्ताव आहे, जो नियम शहराला लागू आहे तो नियम त्या भागातही लागू होणार.

मा. सभापती : प्रस्तावास मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका हद्दीबाहेरील 5 कि.मी. परिसरातील वसाहतींना महानगरपालिकेतर्फे पाणी पुरवठा करावयाचे शासनाचे आदेशानुसार सातारा देवळाई परिसरात कायमस्वरूपी पाणी पुरवठा योजना आखण्याचे दृष्टीने स्त्रोत तपासणी, सर्वेक्षण, आराखडे, अंदाजपत्रके तयार करणे, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून मान्यता घेणे व निविदा प्रक्रियेची कार्यवाही करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. सदरील काम तातडीने करावयाचे असल्याने मनपामध्ये काम केलेली जी कोणती चांगल्या प्रकारे काम करणारी एजन्सी असेल त्यांचेमार्फत तात्काळ काम करून घेण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.104:**

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, दि.28-8-2006 रोजी स्थायी समिती सभेत प्रभाग 'ड' साठी खाजगीकरणाच्या माध्यमातून घनकचरा व्यवस्थापना करीता निवडणूक प्रभाग निहाय रस्त्यांची स्वच्छता व 100% दारोदारी (डोअर टू डोअर) जावून घनकचरा गोळा करण्याच्या प्रस्तावास (विषय क्र.88) नुसार मान्यता देण्यात आली होती. डोअर-टू-डोअर कलेक्शनसाठी 'क' ग्रुपसाठी दोन एजन्सीच्या ऑफर्स सारख्याच होत्या. (1) सेंटर फॉर डेव्हलपमेंट, नागपूर व (2) जागृती एंटरप्राईजेस, औरंगाबाद. मा.आयुक्तांनी सेंटर फॉर डेव्हलपमेंट, नागपूर यांचे नाव निश्चित केले होते. परंतु मा.स्थायी समिती सभेसमोर प्रस्ताव दिताना संबंधीत लिपीक व टायपिस्ट यांच्या टायपींगच्या चुकीमुळे सेंटर फॉर डेव्हलपमेंट ऐवजी जागृती

एंटरप्राईजेस असे नाव टाईप करण्यात आले. त्यामुळे डोअर टू डोअर कलेक्शनसाठी 'क' ग्रुपसाठी जागृती एंटरप्राईजेस, औरंगाबाद ऐवजी सेंटर फॉर डेव्हलपमेंट या कंत्राटदाराच्या नांवास मंजुरी देण्याकरीता सुधारीत प्रस्ताव स्थायी समितीच्या मंजुरीस्तव सादर.

प्रशासनातर्फे डोअर टू डोअर कलेक्शनसाठी पुढील प्रशासकीय प्रक्रिया तुर्त स्थगित करण्यात आलेली आहे.

## वार्ड-ड प्रभागातील डोअर-टू-डोअर कलेक्शन

| प्रभाग क्र. | एकूण लेबर | प्रभागाची किंमत प्रतिमाह | प्राप्त निविदा | अपात्र | पात्र | पात्र ठरलेल्या सर्वात कमी बोली लावलेल्या कंत्राटदारांचे नांव व बोली रक्कम | कंत्राटदाराची बोली रक्कम धरुन प्रभागाची प्रतिमाह किंमत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| क | 52 | 2,58,168/- | 02 | - | 01 | **सेंटर फॉर डेव्हलपमेंट** , 22/5, प्रियदर्शनी कॉलनी, आरटीओ ऑफीसच्या मागे, **नागपूर**. (18% जास्त) रु. 46,470/- | रु. 3,04,638/- |

**संवाद :**

मा. आयुक्त : वॉर्ड-ड मधील सफाई कामाचे खाजगीकरणाबाबत जो प्रस्ताव सभागृहापुढे आला आहे त्यामध्ये टायपींग मिस्टेकमुळे चुकीचे नांव आले होते ते दुरूस्तीसाठी सभागृहापुढे प्रस्ताव ठेवण्यात आला आहे. तो दुरूस्त करावा.

श्री.संजय शिरसाट : कृपया टायपींग मिस्टेक हा शब्द वापरू नका. टायपींग मिस्टेक हा शब्द वेगळ्या अर्थाने वापरला जातो.

सौ.लता दलाल : वास्तविक ही जी चूक झाली होती त्यात संबंधीत विभाग प्रमुखाची तेवढीच जबाबदारी होती. जी त्यांनी टाळलेली आहे. असा आमचा स्पष्ट आरोप आहे. जर प्रस्ताव चूक असेल तर संबंधीतांनी तो वाचून दुरूस्त करून घ्यायला पाहिजे. त्याच्यावर कार्यवाही होऊ नये म्हणून विनंती की, गैरसमजुतीने किंवा कुठल्या आकसाने झालेली कार्यवाही मागे घेण्यात यावी.

मा. सभापती : प्रशासनाने दुरूस्त केलेला प्रस्ताव सभागृहापुढे ठेवलेला आहे. प्रशासनाने केलेली चूक दुरूस्त करत असतांना ज्यांच्यावर चुकीची कार्यवाही झालेली आहे ती रद्द करण्यात यावी आणि तसे आदेश आजच्या आज निर्गमित करण्यात यावेत.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग 'ड' साठी खाजगीकरणाच्या माध्यमातून घनकचरा व्यवस्थापना करीता निवडणूक प्रभाग निहाय रस्त्यांची स्वच्छता व 100% दारोदारी (डोअर टू डोअर) जावून घनकचरा गोळा करण्याच्या मंजूर झालेल्या ठराव क्र.88 मध्ये, डोअर टू डोअर कलेक्शनसाठी 'क' ग्रुपसाठी जागृती एंटरप्राईजेस, औरंगाबाद ऐवजी **सेंटर फॉर डेव्हलपमेंट**, नागपूर या कंत्राटदाराच्या नांवास मंजुरी देण्याबाबतच्या सुधारीत प्रस्तावास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

## वार्ड-ड प्रभागातील डोअर-टू-डोअर कलेक्शन

| प्रभाग क्र. | एकूण लेबर | प्रभागाची किंमत प्रतिमाह | प्राप्त निविदा | अपात्र | पात्र | पात्र ठरलेल्या सर्वात कमी बोली लावलेल्या कंत्राटदारांचे नांव व बोली रक्कम | कंत्राटदाराची बोली रक्कम धरुन प्रभागाची प्रतिमाह किंमत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| क | 52 | 2,58,168/- | 02 | - | 01 | **सेंटर फॉर डेव्हलपमेंट** , 22/5, प्रियदर्शनी कॉलनी, आरटीओ ऑफीसच्या मागे, **नागपूर**. (18% जास्त) रु. 46,470/- | रु. 3,04,638/- |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

राष्ट्रगीता नंतर सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषित केले.

**नगर सचिव**

महानगरपालिका औरंगाबाद